रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक २४०
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार, १८ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग
खासदार श्रीरंग बारणे यांचे फेसबुक पेज हॅक/२
ऑलिव्ह रिडले कासवांची पिल्ले झेपावली हरिहरेश्वर समुद्रात/५
सचिनच्या नेतृत्वाखालील इंडिया मास्टर्स संघ चॅम्पियन/८

## राज्यात उद्यापासून सीईटी प्रवेश परीक्षांना प्रारंभ



**मुंबई :** राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत विविध १९ व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. त्यासाठी बहुतांश सर्वच अभ्यासक्रमांची आवश्यक नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली असून १९ मार्चपासून प्रवेश परीक्षा सुरू होत आहेत. प्रवेश परीक्षेला एमएड आणि एमपीएड या अभ्यासक्रमांच्या परीक्षेने सुरुवात होणार आहे, तर एमएचटी सीईटीची परीक्षा अखेरीस होणार आहे. राज्यभरातून विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी आतापर्यंत १३ लाख ४३ हजार ४१३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. १९ विविध अभ्यासक्रमांपैकी आता बीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम या अभ्यासक्रमांची अर्ज नोंदणी प्रक्रिया शिल्लक असून विधी तीन व पाच वर्षे अभ्यासक्रमांची नोंदणी प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. उर्वरित सर्व अभ्यासक्रमांची अर्ज नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

# औरंगजेबाचे उदात्तीकरण खपवून घेणार नाही!

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा इशारा; शिवरायांच्या मंदिराचे लोकार्पण

**भिवंडी : प्रतिनिधी**

महिमामंडन होईल, तर ते छत्रपती शिवरायांचेच! क्रूर औरंगजेबाच्या पाशवी विचारांचे महिमामंडन अथवा उदात्तीकरण कधीच खपवून घेतले जाणार नाही. तसे करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करून ते विचार तिथेच चिरडून टाकण्यात येतील, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भिवंडीतील कार्यक्रमात बोलताना सोमवारी (दि. १७) समाजकंटकांना दिला.



भिवंडीतील शिवक्षेत्र मराडेपाडा येथे उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराचे (शक्तिपीठ) लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला स्वामी गोविंद देवगिरी महाराज, श्रीक्षेत्र तुंगारेश्वरचे बालयोगी सदानंद महाराज, राष्ट्रसंत नीलकंठ शिवाचार्य महाराज, अलोखनाथ महाराज, खासदार सुरेश उर्फ बाळ्यामामा म्हात्रे, माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, आमदार किसन कथोरे, आमदार निरंजन डावखरे, आमदार महेश चौगुले, आमदार दौलत दरोडा, आयोजक शिवक्रांती प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजू चौधरी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर यासाठी हवे होते की, आज आपण आपल्या इष्टदेवतेच्या मंदिरात जाऊन साधना करू शकतो याचे एकमेव कारण महाराज होते. त्यांनी देव, देश आणि धर्माची लढाई जिंकली. म्हणून तुम्ही आम्ही आपल्या देवांचे दर्शन करू शकतो.

हनुमानाचे दर्शन घेतल्याशिवाय प्रभू श्रीरामांचे दर्शन पूर्ण होत नाही तसेच छत्रपती शिवरायांच्या दर्शनाशिवाय कुठल्याच देवाचे दर्शन हे आपल्याला कधीच फळणार नाही. त्यामुळे त्यांचे मंदिर या ठिकाणी बांधण्याचा जो निर्णय घेण्यात आला, त्याबद्दल शिवक्रांती प्रतिष्ठानचे राजू चौधरी यांचा मनापासून आभार मानतो. अतिशय सुंदर अशा प्रकारचे मंदिर उभारले आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे जे १२ किल्ले आहेत त्या किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळ म्हणून मान्यता मिळून देण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'युनोस्को'मध्ये तसे नॉमिनेशन करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी दिली.

# महायुती सरकारला कुणी धक्का लावू शकत नाही

■ उपमुख्यमंत्री अजित पवारांची विधानसभेत फटकेबाजी

**मुंबई : प्रतिनिधी**

ब्रह्मदेव आला तरी पाच वर्षांत या महायुतीच्या सरकारला कुणी धक्का लावू शकत नाही, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी विरोधकांना टोला लगावला. अर्थसंकल्पावरील चर्चेस विधानसभेत उत्तर देताना त्यांनी फटकेबाजी केली.

काही योजना त्या त्या वेळी उद्‌भवलेल्या परिस्थितीनुसार सुरू केल्या जातात. सर्वच योजनांचे वेळोवेळी पुनर्विलोकन होत असते. ज्या योजना कालबाह्य ठरतात, त्या बंद कराव्या लागतात, मात्र महायुती सरकारने सुरू केलेल्या योजना बंद करणार नसल्याचे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

काँग्रेस नेते नाना पटोले यांनी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना मुख्यमंत्रिपदाची ऑफर देत



महाविकास आघाडीत येण्याचा सल्ला दिला होता. या विधानाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री पवार त्यांचे नाव न घेता म्हणाले, आम्ही हा अर्थसंकल्प केवळ चालू वर्षाचा विचार करून तयार केलेला नाही, तर पुढील पाच वर्षांचा विचार करून तयार केला आहे. या पाच वर्षांत कुणी गमतीने जरी म्हटले की, अमक्या-तमक्याने मुख्यमंत्री व्हा आणि पाठिंबा देतो. तरी ते काही शक्य नाही. तुमच्याकडे पुरेसे आमदारच नाहीत तर तुम्ही पाठिंबा कसला देणार?

### लाडकी बहीण योजना चालूच राहणार!

*या वेळी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवर बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, ही योजना आम्ही चालू ठेवणार आहोत. लाडक्या बहिणींना आतापर्यंत दिलेले पैसे परत घेतले जाणार नाहीत तसेच या योजनेला जो निधी लागणार आहे तो देणार आहोत, मात्र ही योजना गरीब घटकातील महिलांसाठी आहे. त्यामुळे काही गोष्टी लक्षात आल्यानंतर या योजनेत दुरूस्ती करणार आहोत. ही योजना बंद करणार नाही. त्याच्यामध्ये कुठल्याही गरीब महिलेवर अन्याय करणार नाही. ज्यांना गरज आहे त्यांना १०० टक्के मदत देणारच!*

## वाळू तस्करीला आळा घालण्यासाठी सर्वंकष धोरण आणणार -महसूलमंत्री



**मुंबई :** वाळू तस्करीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सध्या राज्यात महसूल आणि पोलीस दलाकडून संयुक्त कारवाई करण्यात येते, परंतु राज्यात वाळूमाफिया व वाळू तस्करीच्या घटना वाढतच आहेत. यासाठीच राज्य शासन सर्वंकष वाळू धोरण तयार करणार आहे, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

विधान परिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री बावनकुळे बोलत होते. या वेळी सदस्य प्रवीण दरेकर, शशिकांत शिंदे, एकनाथ खडसे यांनी चर्चेत सहभाग घेतला. वाळूमाफियांना व वाळू तस्करांना संरक्षण मिळणार नाही अशी ग्वाही देऊन मंत्री बावनकुळे म्हणाले की, गोदावरी खोऱ्यातील वाळू उपशाबाबत सात दिवसांत चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल. **(पान २ वर..)**

# न्यू ऑरेंज सिटी को-ऑप. सोसायटीतील गैरव्यवहारप्रकरणी तातडीने चौकशीचे आदेश

**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

न्यू ऑरेंज सिटी अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी मर्यादित संस्थेतील गैरव्यवहारासंदर्भात तातडीने सखोल चौकशी करण्यात येईल आणि एक ते दीड महिन्यात चौकशी अहवाल सादर करून पुढील कार्यवाही करणार असल्याची माहिती सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सोमवारी (दि. १७) विधीमंडळाच्या अधिवेशनात दिली

नागपूर जिल्ह्यातील न्यू ऑरेंज सिटी अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी मर्यादित संस्थेच्या अध्यक्षांनी ठेवीदारांच्या




रकमेत केलेल्या गैरव्यवहाराचा मुद्दा सोमवारी विधानसभेत उपस्थित झाला. या संस्थेच्या अध्यक्षांनी ठेवीदारांच्या ठेवींच्या रकमेत गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले. या संदर्भात आमदार

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपप्रश्नाला मंत्री डॉ. पंकज भोयर यांचे उत्तर

प्रशांत ठाकूर यांनी शासनाकडून देण्यात आलेल्या उत्तराच्या अनुषंगाने उपप्रश्न उपस्थित केला. कलम ८८च्या अंतर्गत कारवाई सुरू असल्याचे उत्तर शासनाकडून देण्यात आले आहे. २१ एप्रिल २०२३च्या आदेशान्वये ८८ची चौकशी सुरू झालेली आहे. अशा पद्धतीचा ज्या वेळेला गैरव्यवहार होतो त्या वेळेला या संदर्भामध्ये लवकरात लवकर जबाबदारी निश्चित करणे आणि अशा प्रकरणातील वसुली करून ठेवीदाराला न्याय मिळवून देणे अपेक्षित असते. जर दीर्घकाळ चौकशी चालू राहिली तर ठेवीदारांना न्याय कसा मिळणार असा सवाल आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित करून किती कालावधीत चौकशी पूर्ण होईल आणि संबंधित ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळण्याच्या दृष्टिकोनातून कार्यवाही करण्याची मागणी सभागृहात केली.

या प्रश्नावर सभागृहात उत्तर देताना मंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले की, आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित केलेला प्रश्न खरा आहे. न्यू ऑरेंज सिटी अर्बन क्रेडीट को-ऑप सोसायटी मर्यादित संस्थेत गैरव्यवहार झाल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली आहे. या गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी विशेष लेखापरीक्षक-२ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निश्चितच चौकशीला उशीर झाला आहे. त्यामुळे या प्रकरणाची तत्काळ चौकशी करून एक ते दीड महिन्याच्या आत चौकशी अहवाल सादर केला जाईल आणि त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे त्यांनी आश्वासित केले.

## निवडक

### मुंबईत महिलेची २० कोटींची डिजिटल फसवणूक; दोघे अटकेत

**मुंबई :** दक्षिण मुंबईतील ८६ वर्षीय महिलेची डिजिटल अरेस्टच्या नावाखाली तब्बल २० कोटींची फसवणूक करण्यात आली आहे. सायबर चोरट्यांनी पोलीस अधिकारी असल्याचे सांगून वृद्ध महिलेला फोन केला आणि आधार कार्डचा अवैध कामासाठी वापर झाल्याचे सांगून २६ डिसेंबर २०२४ ते ३ मार्च २०२५ या काळात तिच्या खात्यामधील पैसे विविध बँक खात्यात वळवून घेण्यात आले. या प्रकरणी क्राइम ब्रँचच्या सायबर पोलीस शाखेने शायन जमील शेख (२०) आणि राजीक आझम बट (२०) यांना अटक केली आहे.

### टोरेस गैरव्यवहारप्रकरणी आरोपींविरोधात आरोपपत्र

**मुंबई :** टोरेस गुंतवणूक गैरव्यवहार प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने सोमवारी (दि. १७) आठ आरोपींविरोधात सत्र न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. या प्रकरणात आतापर्यंत १४ हजार १५७ गुंतवणूकदार आर्थिक गुन्हे शाखेकडे आले असून त्यांची १४२ कोटी ५८ लाख रुपयांची फसवणूक झाली आहे.

## स्व. गंगादेवी बालदी यांची शोकसभा; मान्यवरांकडून श्रद्धांजली





**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या मातोश्री गंगादेवी रतनलाल बालदी यांचे नुकतेच निधन झाले. त्यांची शोकसभा रविवारी (दि. १६) उरण येथे रविवारी झाली. या शोकसभेत राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संजीव नाईक, आमदार प्रशांत ठाकूर यांनी श्रद्धांजली वाहिली.

गंगादेवी बालदी यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९० वर्षांच्या होत्या. त्यांची शोकसभा उरण बोरी रोड येथील यूईएस स्कूलमध्ये रविवारी झाली. या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी श्रद्धांजली वाहिली.

या शोकसभेला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते स्व. दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, उरणच्या माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, भाजप शहराध्यक्ष कौशिक शाह, अशोक बालदी, राधिका बालदी, स्नेहा बालदी, शुभम बालदी यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.



**उरण : आमदार महेश बालदी यांच्या मातोश्री गंगादेवी रतनलाल बालदी यांचे नुकतेच निधन झाले. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा भाजपचे रायगड जिल्हा संपर्कमंत्री आशिष शेलार, पंढरपूरचे आमदार समाधान औताडे यांनी सोमवारी आमदार महेश बालदी यांच्या निवासस्थानी भेट देऊन स्व. गंगादेवी यांना आदरांजली अर्पण केली व बालदी परिवाराचे सांत्वन केले. या वेळी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते.**



## श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून जिज्ञासा कडूला उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वैद्यकीय शिक्षणासाठी पनवेल येथील जिज्ञासा कडू हिला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून पाच लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. मदतीचा धनादेश लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते जिज्ञासाला सुपूर्द करण्यात आला.

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात गेल्या तीन दशकपेक्षा जास्त वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन स्वतःच्या पायावर उभे केले जाते. जिज्ञासाने एमबीबीएस शिक्षण पूर्ण केले असून ती पुढील वैद्यकीय शिक्षण सांगलीमधील प्रकाश इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स ॲण्ड रिसर्च येथे मास्टर ऑफ सर्जरी हे शिक्षण घेणार आहे. त्यासाठी तिला आर्थिक मदतीची आवश्यकता होती. त्यानुसार तिला मदत करण्यात आली असून मदतीचा धनादेश लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जिज्ञासाचे अभिनंदन करून तिला पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी तिचे वडील ज्येष्ठ पत्रकार विजय कडू, आई भारती कडू, ॲड. परेश गायकवाड, मंडळाचे व्यवस्थापक अनिल कोळी उपस्थित होते.

## पर्यटकांच्या फसवणुकीविरोधात आजपासून माथेरान बेमुदत बंद

**माथेरान, नेरळ : प्रतिनिधी**

माथेरानला येणाऱ्या पर्यटकांची दस्तुरी नाक्यावर केल्या जाणाऱ्या दिशाभूल आणि फसवणुकीच्या विरोधात माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समितीने मंगळवार (दि. १८)पासून बेमुदत बंदची हाक दिली आहे. त्यास स्थानिक हॉटेल इंडस्ट्री, ई-रिक्षा संघटना, व्यापारीवर्ग तसेच विविध सामाजिक संस्थांनी पाठिंबा जाहीर केला आहे.

या संदर्भात माथेरान येथील अधीक्षक कार्यालयात सोमवारी समितीच्या सदस्यांची बैठक झाली. या वेळी प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसल्याचे सांगत प्रशासन मागण्या पूर्ण करत नाही तोपर्यंत बेमुदत बंद ठेवण्यात येणार असल्याचे समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या बंदमध्ये शालेय विद्यार्थ्यांना ई-रिक्षाची सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असून अन्य कुणाही प्रवाशांना ही सेवा उपलब्ध होणार नाही. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# नागरिकांनी पाणी जपून वापरावे

### रायगड जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

एप्रिल व मे महिन्यात जलस्रोतातील पाण्याची पातळी खालावल्याने रायगड जिल्ह्यात काही भागात पाणीटंचाई निर्माण होते. या संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासन सज्ज होत असून नागरिकांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले आहे तसेच पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी उपाययोजना सुचविल्या आहेत.

रायगड जिल्ह्यातील काही गावांना एप्रिल, मे महिन्यात दरवर्षी पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. या पार्श्वभमीवर प्रशासनाने आतापासूनच उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे.

नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा, अपव्यय करू नये, पिण्याच्या पाण्याच्या मुख्य



स्रोतांव्यतिरिक्त परिसरातील इतर उपलब्ध स्रोतांमधील पाण्याचा दैनंदिन वापरासाठी वापर करावा, जलस्रोत दूषित होणार नाहीत याची सर्वांनी काळजी घ्यावी, कुठे पाणीपुरवठा पाईपलाईन फुटली असल्यास निदर्शनास आणून द्यावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी जिल्ह्यातील नागरिकांना केले आहे.

### पाच कोटी ६२ लाखांचा पाणीटंचाई आराखडा

रायगड जिल्ह्यात पाणीटंचाई निर्माण झाल्यास त्याचा मुकाबला करण्यासाठी पाच कोटी ६२ लाख ६८ हजार रुपयांचा पाणीटंचाई आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड्यात एक हजार १६ गावे व वाड्यांचा समावेश करण्यात आला आहे. आराखड्यात विहिरी खोल करणे गाळ काढणे या कामासाठी ६० लाख १८ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, तर टँकर, बैलगाडीने पाणीपुरवठा करणे तीन कोटी ५२ लाख ९२ हजार, नवीन विंधन विहिरी एक कोटी तीन लाख ६८ हजार आणि विंधन विहिरींची दुरूस्तीसाठी ४५ लाख ९० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभाग कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर यांनी दिली.

# आजपासून माथेरान बेमुदत बंदची हाक

## पर्यटकांच्या फसवणुकीविरुद्ध हॉटेल इंडस्ट्रीसह ई-रिक्षा व अन्य संघटना एकवटल्या

**माथेरान,नेरळ: बातमीदार**

दस्तुरी नाक्यावरील येणाऱ्या पर्यटकांची दिशाभूल करून आर्थिक फसवणूक केली जाते. याचा येथील सर्वसामान्य कष्टकरी पासून ते हॉटेल इंडस्ट्री या सर्वांच्या व्यवसायावर विपरीत परिणाम झालेला आहे.ही फसवणूकीची पध्दत लवकरच बंद करण्यात आली नाही तर १८ मार्च पासून बेमुदत माथेरान बंद करण्यात येणार असा इशारा समितीने दिला होता .त्याला स्थनिक प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद न दिल्याने आज पासुन माथेरान बेमुदत बंद होणार आहे

अधीक्षक कार्यालयात समितीच्या सदस्यांच्या बैठकीचे आयोजन सोम. दि.१७ रोजी करण्यात आले होते.या बैठकीत स्थानिक प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला नाही माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समितीने मागणी केलेल्या शुल्क मागण्यांची पूर्तता प्रशासन स्थानिक पातळीवर करू शकत नसल्याने पर्यटन बचाव संघर्ष समितीने दि.१८ मार्च पासून बेमुदत बंद जाहीर केला असून त्यास येथील हॉटेल इंडस्ट्री, ई रिक्षा संघटना,



व्यापारी वर्ग, विविध सामाजिक संस्था यांनी समर्थन दिले असून जोपर्यंत स्थानिक प्रशासन लेखी स्वरूपात मागणी केलेल्या शुल्क मागण्या कायमस्वरूपी पूर्ण करत नाही तोपर्यंत हे पर्यटनस्थळ बेमुदत बंद करण्यात येणार असल्याचे समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले आहे .या बंद मध्ये शालेय विद्यार्थ्यांना ई-रिक्षाची सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे परंतु कोणाही प्रवाशांना ही सेवा उपलब्ध होणार नाही.

माथेरानचे मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी नाक्यावर पर्यटकांना ज्याप्रकारे फसवून त्यांची दिशाभूल केली जाते, त्यांना बळजबरीने गावात येण्याऐवजी पॉईंट्स दाखवून उशिरा हॉटेलमध्ये सोडण्यात येते. मिनिट्रेन बंद असून ई रिक्षाची सेवा फक्त स्थानिकांना दिली जाते अशी खोटी माहिती देऊन स्वतःच्या घोड्यावर बसवून नवख्या पर्यटकांची दिशाभूल करून अव्वाच्या सव्वा रक्कम उकाळली जाते त्यासाठी दस्तुरी नाक्यावरील अंतर्गत भागात घोडेवाले असोत किंवा कुली, रूम्सचे एजंट, रिक्षावाले यांना प्रवेश देऊ नये. जागोजागी माहिती फलक लावण्यात यावेत, सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत.अशी माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समितीने मागणी केली होती.

ही मागणी पूर्ण झाली नाही तर माथेरान बेमुदत बंद करण्याचा इशारा सुध्दा या समितीने अधीक्षक सुरेंद्र ठाकूर, मुख्याधिकारी राहुल इंगळे, वनखात्याच्या अधिकारी वर्गाला तसेच पोलीस ठाण्यात सुध्दा लेखी निवेदना द्वारे दिला होता. परंतु एवढे दिवस उलटूनही या स्थानिक प्रशासनाने काहीएक उपाययोजना केली नाही त्यामुळे नाईलाजाने माथेरान बेमुदत बंद करून शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी समितीने बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

या वेळी समितीचे प्रमुख कुलदीप जाधव, मनोज खेडकर, शिवाजी शिंदे, प्रवीण सकपाळ, राजेश चौधरी, प्रदीप घावरे, चंद्रकांत जाधव, हॉटेल इंडस्ट्रीचे उमेश दुबल, ई-रिक्षा संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल, चर्मकार समाज अध्यक्ष नितेश कदम, महिला आघाडीच्या संगीता जांभळे, सुहासिनी शिंदे, प्रतिभा घावरे, स्वाती कुमार, सुहासिनी दाभेकर, अंकिता तोरणे, श्रुतिका दाभेकर यांसह अन्य उपस्थित होते.

# वावेघर येथून शस्त्र व काडतुसे जप्त

## रसायनी पोलिसांची कारवाई; दोन जण अटकेत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलिसांनी मोटरसायकलवरून जाण्याऱ्या दोन संशयीतांकडुन एक सिंगल नळी बंदुक व ५ प्लॅस्टिकचे आवरण असलेले १२ एम.एम. बोअरचे जिवंत काडतुस जप्त करुन त्यांना अटक केली आहे.

गुन्हे

रसायनी वावेघर येथील इंडीयन आॅइल पेट्रोल पंपाचे मागील ग्राऊंडवरून मोटार सायकल मुख्य रस्त्याचे बाजुकडे जोरात आली. त्यांचा संशय आल्याने बिट मार्शल अंमलदार विशाल पाटील व होमगार्ड बांगर यांनी मोटार सायकल थांबवुन त्यांचेकडे विचारपुस केली.यावेळी ते उडवा उडवीची उत्तरे देवु लागले. त्यावेळी त्यांचे सोबत असलेली बॅग चेक करणेकरता मागितली असता ती त्यांनी नकार दिला.

यावेळी बिट मार्शल अंमलदार यांनी पोलीस निरीक्षक संजय बांगर यांना फोन करून सदरबाबत कळविले. त्याप्रमाणे सदरील घटनास्थळी पोलीस निरीक्षक संजय बांगर, महिला श्रेणी पोलीस उपनिरीक्षक धारपवार, पाहवा/सचिन चौरे, पोहवा/सुशांत पिंगळे, पोशी/राहुल भडाळे, पोशी/ राजेश वळवी, पोशी /रूपेश सपकाळ असे पोहचुन पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी दोन पंचाचे समक्ष मोटार सायकलवरील इसमांचे सोबत असलेली बॅग चेक केली असता त्यामध्ये एक सिंगल नळी बंदुक व ५ प्लॅस्टिकचे आवरण असलेले १२ एम.एम. बोअरचे जिवंत काडतुस मिळुन आले.

त्यानंतर त्यांचे नांव गाव विचारता त्यांनी त्यांचे नांव १) भालचंद्र दत्तात्रेय शिद व ३५ वर्ष, २) कल्पेश रामचंद्र वाघ वय-२२ वर्ष दोन्ही रा.वार्दोली तारटेप ठाकुरवाडी, ता. पनवेल असे असल्याचे सांगितले. सदरील इमसांचे ताब्यात मिळुन आलेली एक सिंगल नळी बंदुक व ५ प्लॅस्टिकचे आवरण असलेले १२ एम.एम. बोअरचे जिवंत काडतुसे तसेच शाईन मोटार सायकल ही जप्त करण्यात आली आहे. सदरबाबत वर नमुद इसमांचे विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.गुन्हयाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव हे करत आहेत.

सदरील कामगिरी रायगड जिल्हयाचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे तसेच उप-विभागिय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांच्या मागदर्शनाखाली रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय बांगर यांचे अधिपत्याखाली बिट मार्शल अंमलदार पोशी/ विशाल शामकांत पाटील व होमगार्ड/बांगर यांनी केलेली आहे.

# खरबाचीवाडी परिसरात वणवा; अग्निशमन दल, ग्रामस्थांमुळे अनर्थ टळला

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड आणि रोहा तालुक्याच्या सीमेवर असणाऱ्या खरबाचीवाडी गावाच्या परिसरात गवताच्या माळाला दुपारच्या वेळी वणवा लागला. या वणव्याची तीव्रता एवढी होती की बघता बघता हा वणवा खरबाचीवाडी गावात पोहचला. संपूर्ण गाव वणव्याच्या विळख्यात सापडला.त्यामुळे ग्रामस्थ मोठया प्रमाणावर भयभीत झाले.त्यावेळी रोहा पोलीस स्टेशनला संपर्क केला असता त्यानी अग्निशमन दलाच्या गाडीला घटनास्थळी बोलवले. ही आग विझवण्यासाठी शेजारील गावातील ग्रामस्थ,तसेच रोहा पोलीस कर्मचारी,वनरक्षक यांनी प्रयत्न



केले. त्यामुळे इंदरदेव धनगरवाडाची पुनरावृत्ती टळली आहे.

या वणव्याने अचानक गावातील सुकलेल्या फणसाच्या वृक्षाने पेट घेतला आणि त्यातील फूनगी उडून गावाच्या मध्यभागी असणाऱ्या मधुकर कदम यांच्या मालकीच्या गुरांच्या गोठयावर पडली आणि हळूहळू गुरांच्या गोठ्यानी पेट घेतला.काही वेळातच त्या गोठ्यातील पेंढ्याने पेट घेऊन आगीने उग्ररूप धारण केले .

रोहा वरून अग्निशमन दलाची गाडी पोहचे पर्यंत ग्रामस्थ शर्तीचे प्रयत्न करून आग विझविण्याचा प्रयत्न करत होते. गुरांच्या वाड्या शेजारील घरांना आग लागण्यास सुरुवात झाली होती. त्यावेळेस मधुकर कदम यांची मुलगी दामिनी हिने प्रसंगावधान दाखवत त्या आग लागलेल्या घरातील सिलेंडर टाक्या घरात जाऊन बाहेर काढून अनर्थ टाळला.

अग्निशमन दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाल्यावर अग्निशमन दलाचे जवान आणि ग्रामस्थ यांच्या अथक परिश्रमाने या आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले.त्यामुळे मोठी जीवित हानी टळली, मात्र या वणव्यात मधुकर कदम यांचा वाडा त्यातील पेंढी जळून खाक झाले तसेच शेतकरी शरद गोळे यांची ५० आंब्याची झाडे जळाली त्यामुळे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले.

**गेल्या काही दिवसांत सुधागड आणि रोहा तालुक्यात मोठ्या प्रमाणावर वणवे लागत आहेत. हे वणवे रोखण्यासाठी ठोस पावले उचलणे गरजेचे आहेत. ज्यांच्या हलगर्जीपणामुळे हे वणवे लागत आहेत त्यांच्यावर कायदेशीर कारवाईही होणे गरजेचे आहे.**
**-शरद शिंदे, माजी सरपंच, गारभट ग्रामपंचायत**

# बॉक्साईड वाहतुकीवरून श्रीवर्धन पोलीस ठाण्यात बाचाबाची

## शिवसेना जिल्हाप्रमुखांची गाडी फोडण्याची धमकी

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धनमध्ये होत असलेल्या बॉक्सईड विरोधात शिवसेना आक्रमक झाली असून येत्या २० मार्च रोजी उपविभागीय कार्यालयावर धडक मोर्चा आणण्याचं नियोजन केलं आहे.याविरोधात काही ट्रान्सपोर्ट कंपनीकडून प्रतिमोर्चा काढण्याचं निवेदन श्रीवर्धन पोलीस ठाण्यात दिल आहे.

यादरम्यान शिवसेना संघटनेचा मोर्चा काढण्यासाठी लागणाऱ्या परवानग्या घेण्यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर व संघटनेचे शिष्टमंडळ श्रीवर्धन पोलीस ठाण्यात पोहचले आसता ट्रान्सपोर्ट कंपनी विरुद्ध शिवसेना संघटना अशी दोन गटात श्रीवर्धन पोलीस ठाण्यात बाचाबाची झाली.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांची श्रीवर्धन मतदार संघात फिरल्यास गाडी फोडू अश्या धमक्या देण्यात आल्या. या वेळी शिवसैनिक यांच्याकडून देखील प्रतिउत्तर दिले. श्रीवर्धन पोलिसांनी दोन्ही गटांना बाजूला करुन जमाव पांगवला.

स्थानिक नागरिकांना होणाऱ्या त्रासाविरोधात कोणत्याही दबावाला बळी न पडता २० तारखेला शिवसेनेचा धडक मोर्चा निघणार, असे घोसाळकर म्हणाले.

# महाड तालुक्यात तिथीप्रमाणे शिवजयंती साजरी; दौलत गड मशालींनी उजळला, वाळसूरे येथे पुतळ्याला अभिवादन

**महाड : प्रतिनिधी**

शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला छ. शिवरायांचा टेहेळणी किल्ला असलेला दौलतगड ३५० मशालींनी उजळला. दौलतगड प्रतिष्ठान मार्फत गडावर मशाल महोत्सवाचे आयोजन केले होते. यावेळी गडावर मशाली प्रज्वलित करून शिवजन्मोत्सवाचा आनंद साजरा करण्यात आली तर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण राऊळ यांनी वाळसुरे येथी अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करीत शिवजयंती साजरी करण्यात आली.

महाड तालुक्यातील दासगाव येथील दौलत गडावर दौलत गड प्रतिष्ठान मार्फत जागर दौलत गडाचा या सोहळ्याच्या आयोजन करण्यात आले होते. शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला दिनांक १६ मार्च रोजी गडावर या उत्सवाच्या निमित्ताने साडेतीनशे मशाली प्रज्वलित करण्यात आल्या. रात्रीच्या अंधारात या मशालीने दौलत गड उजळला गेला. पारंपारिक वेशभूषा आलेल्या महिला आणि पुरुषांनी शिवजन्मोत्सवाचा आनंद मशाल प्रज्वलन करून साजरा केला. गडावर ढोल ताशांच्या गजरामध्ये छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन आणि मिरवणूक काढण्यात आली. यावेळी छत्रपती शिवरायांचा जयघोष करण्यात आला. तसेच पारंपरिक गोंधळ देखील सादर करण्यात आला यामुळे गडावर शिवमय वातावरण निर्माण झाले होते. दौलत गड प्रतिष्ठानच्या मार्फत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या मशाल महोत्सवाच्या निमित्ताने दासगाव आणि परिसरातील शिवभक्तांनी गडावर हजेरी लावली होती. तर स्वराज्याची राजधानी किल्ले रायगड पायथ्या शेजारी असलेल्या वाळसुरे गावातही शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. या प्रसंगी रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण राऊळ यांनी छ शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करीत गावातुन शिवरायांची पालखी मिरवणूक काढत शिवजयंती उत्सव साजरा केला.

महाड तालुक्यामध्ये छत्रपती शिवरायांची तिथीप्रमाणे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी झाली. उत्सव समितीच्या वतीने भव्य मिरवणूक काढण्यात आली

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विद्यार्थिनींना आरोग्यासंदर्भात मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवार दिनांक १७ मार्च रोजी मॅनेजमेंट स्टडीज विभागातर्फे रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयातील (पेठपाडा) मुलींच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी यावरती सत्राचे आयोजन केले होते.

या सत्रासाठी महाविद्यालयातील मॅनेजमेंट स्टडीज विभागातील प्रा. शितल चव्हाण व प्रा. शगुप्ता शान यांनी मुलींना वेगवेगळे प्रश्न विचारून त्यांच्या आरोग्य विषयी असणाऱ्या समस्या जाणून घेतल्या तसेच त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. ह्या सत्राचा प्रमुख उद्देश विद्यार्थिनींशी संवाद साधून त्यांच्या आरोग्य स्थितीबद्दल जाणून घेणे व त्यांचे मनोबल वाढवणे हा होता.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या सामाजिक उपक्रमाचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल मॅनेजमेंट स्टडीज विभागाचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. रीत थुले (मॅनेजमेंट स्टडीज विभाग प्रमुख) यांनी केले तसेच याच विभागातील इतर सर्व प्राध्यापक विद्यार्थी, अनंत सावंत व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



# खासदार श्रीरंग बारणे यांचे फेसबुक पेज हॅक

## सायबर पोलिसांकडे तक्रार; कोणताही प्रतिसाद न देण्याचे आवाहन

**उरण : बातमीदार**

मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांचे फेसबुक पेज हॅक झाल्याचे समोर आले आहे. याबाबत बारणे यांनी पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या सायबर शाखेकडे तक्रार दिली आहे. या पेजवरून चुकीचा संदेश, पैशांची मागणी झाल्यास त्याकडे दुर्लक्ष करण्याचे आवाहन बारणे यांनी केले आहे.

एखाद्याचे फेसबुक अकाऊंट, पेज हॅक करून नंतर मित्र परिवाराला पैसे मागण्याच्या घटना अनेकदा घडतात. या हॅकींगचा फटका मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांना बसला आहे. खासदार बारणे यांचे फेसबुकवर Shrirang Appa Barne या नावाने पेज आहे. हे पेज हॅक



करण्यात आले आहे. हॅकर्सनी पेजवरील फोटो डिलीट केले आहेत. काही नवीन फोटो टाकले आहेत. ही बाब लक्षात येताच अज्ञात हॅकर्स विरोधात पोलिसांकडे तक्रार दिली असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले आहे.

याबाबत खासदार बारणे म्हणाले, फेसबुक पेज हॅक झाले आहे. या पेजवरून आक्षेपार्ह पोस्ट आल्यास त्यावर प्रतिक्रीया व्यक्त करू नका,पैशांची मागणी केल्यास प्रतिसाद देऊ नका, त्याकडे दुर्लक्ष करा, याबाबत पोलिसांकडे तक्रार दिली आहे.

पान १ वरुन

## वाळू तस्करीला आळा घालण्यासाठी सर्वंकष धोरण आणणार -महसूलमंत्री

राज्य शासन नव्या वाळू धोरणाबाबत काम करीत असून यानुसार आता एम सॅन्ड म्हणजेच दगडापासून तयार केलेल्या वाळूच्या वापरावर भर देण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वाळू क्रशर उभारण्यात येणार आहे. त्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान ५० ते १०० अशा प्रकारचे क्रशर उभारण्याचे नियोजन आहे. यामुळे वाळूची उपलब्धता वाढून सध्या वाळूपुरवठा आणि मागणीमध्ये असलेली तफावत दूर होणार आहे. त्यामुळे वाळूमाफियांवर आपोआप नियंत्रण येईल तसेच वाळू तस्करीबाबत महसूल व पोलीस अधिकारी यांना कारवाईचे समान अधिकार देण्याचाही वाळू धोरणामध्ये समावेश असणार आहे. वाळू धोरण तयार करताना लोकांच्या सूचनांचाही त्यामध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे. त्याशिवाय रत्नागिरी, रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या सक्शनपंपाच्या सहाय्याने वाळू उपशाची चौकशी करून कारवाई करण्यात येईल, असेही मंत्री बावनकुळे यांनी सभागृहात सांगितले.

# भारती प्रतापराव पवार यांचे निधन

**पुणे :** भारती प्रतापराव पवार (वय ७७ वर्षे) यांचे सोमवारी सायंकाळी दीर्घआजाराने निधन झाले. 'सकाळ'चे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्यामागे मुलगा 'सकाळ'चे व्यवस्थापकीय संचालक अभिजीत पवार आणि मुलगी अश्विनी, सून, नातवंडे असा परिवार आहे. भारती पवार यांच्या पार्थिवावर मंगळवारी (ता. १८) पुण्यात अंत्यसंस्कार होणार आहेत.



भारती पवार या पूर्वाश्रमीच्या भारती श्रीपतराव पाटील होत. मूळच्या मुंबईतील असलेल्या भारती यांचे बालपण शिवाजी पार्क परिसरात गेले. रुईया महाविद्यालयातून त्यांनी कला शाखेची पदवी घेतली. १९७० मध्ये त्यांचा प्रतापराव पवार यांच्याशी विवाह झाला. 'सकाळ'च्या माध्यमातून त्या अनेक उपक्रमांत सहभागी होत. औंधजवळील बालकल्याण संस्थेमध्ये त्या सुमारे ३५ वर्षे सक्रिय होत्या. तसेच 'सकाळ' संचलित कोरेगाव पार्क आणि कोथरूड येथील अंधशाळेतही त्या विश्वस्त होत्या. तेथील अनेक उपक्रमांत त्या सहभागी होत.

# 'सिडकोच्या यशस्वी वाटचालीत सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांचे योगदान'

**नवी मुंबई : सिडको वृत्त**

सिडको महामंडळाची नगर नियोजन व विकास क्षेत्रातील कामगिरी ही जागतिक दर्जाची असून नवी मुंबईसारखे सुनियोजित शहर विकसित करण्याचे श्रेय सिडकोतील सर्व आजी-माजी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आहे, असे गौरवोद्गार विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी येथे काढले.

सिडको भवन येथे १७ मार्च २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सिडकोच्या पंचावन्नाव्या वर्धापन दिन कार्यक्रमवेळी ते बोलत होते.

या वेळी सहव्यवस्थापकीय संचालक, डॉ.राजा दयानिधी, गणेश देशमुख, सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी, प्रमदा बिडवे, प्र. व्यवस्थापक(कार्मिक), नरेंद्र हिरे, अध्यक्ष, एम्प्लॉईज युनियन, नितीन कांबळे, सरचिटणीस, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.



## दुखवटा

### निर्मला शेट



**माणगाव :** येथील प्रतिष्ठित व्यापारी कृष्णकांत गणपत शेट (भाई ) यांच्या मातोश्री निर्मला गणपत शेट यांचे शनिवार दि.१५ मार्च रोजी वृद्धापकाळाने राहते घरी माणगाव येथे निधन झाले. मृत्यूसमई त्यांचे वय ८८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्च्यात तीन बहिणी,एक मुलगा,सून,नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी सोमवार दि.२४ मार्च रोजी तर उत्तरकार्य विधी गुरुवार दि.२७ मार्च रोजी राहते घरी होणार असल्याची माहिती त्यांचे पुत्र कृष्णकांत शेट (भाई ) यांनी दिली.

### रूपेश जाधव



**माणगाव :** येथील सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव यांचे पती रूपेश अशोक जाधव यांचे सोमवार दि.१७ मार्च अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमई त्यांचे वय ५३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्च्यात पत्नी,तीन भाऊ,एक मुलगा,सून,नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर माणगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. दशक्रिया विधी बुधवार दि.२६ मार्च रोजी जुने माणगाव संगमेश्वर मंदिर येथील संगमावर तर उत्तरकार्य विधी शुक्रवार दि.२८ मार्च रोजी राहते घरी निजामपूररोड,एकतानगर माणगाव येथे होणार आहे.

# विद्यार्थ्यांचे सायबर फसवणुकीबाबत प्रबोधन

## सीकेटी महाविद्यालयातर्फे रिटघर येथील शाळेत जनजागृती सत्र





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) मधील वाणिज्य विद्याशाखेच्या लेखा आणि वित्त विभागाच्या प्राध्यापक आणि विद्यार्थी चमूने रयत शिक्षण संस्थेचे श्री. भैरवदेव विद्यालय आणि लोकनेते रामशेठ ठाकूर कनिष्ठ महाविद्यालय, रिटघर येथील विद्यार्थ्यांना ऑनलाईन फसवणूक, बोगस गुंतवणूक योजना, बँकिंग फसवणुकीपासून जागरूकता आणि नागरिकांना सावध करण्याच्या हेतूने रिटघर येथे शनिवारी (दि.१५) प्रबोधनपर सत्राचे आयोजन केले होते.

या वेळी रिटघर ग्रामपंचायतीचे सरपंच सुभाष भोपी तथा रिटघर कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सत्राची सुरुवात स्वागत समारोहाने झाली, सीकेटी महाविद्यालयाच्या लेखा व वित्त विभागाचे प्रा. अनिकेत सोनसुरकर यांनी ग्रामपंचायतीचे सरपंच सुभाष भोपी यांचे तर प्रा. आलोक भानुशाली यांनी भैरवदेव विद्यालय आणि लोकनेते रामशेठ ठाकूर कनिष्ठ महाविद्यालय, रिटघरचे प्राचार्य बबन साळुंखे यांचे स्वागत केले.

यानंतर जागरूकता सत्राचे प्रास्ताविक सादर करताना लेखा व वित्त विभागाची विद्यार्थिनी केसर वडवळ हिने सायबर गुन्हे विषयाची संकल्पना, संभाव्य धोके, प्रतिबंधात्मक प्रणाली याबाबत संक्षिप्त आढावा दिला. प्रा. अनिकेत सोनसुरकर यांनी सायबर गुन्हेगारी म्हणजे काय? ऑनलाईन फसवणूक, बँक आणि आर्थिक व्यवहार यांविषयीचे गुन्हे कश्यापद्धतीने घडतात याविषयीचे मार्गदर्शन केले.

प्रा. करण कोळी यांनी सायबर गुन्ह्याविषयीच्या सत्यघटना सांगून त्यांचे शास्त्रीय विवेचन करत त्याची दाहकता आणि संभाव्य धोका टाळण्याचा सल्ला दिला.

प्रा. आलोक भानुशाली यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सायबर गुन्ह्यापासून स्वतःला कसे सुरक्षित ठेवले जावू शकते याबाबत सांगितले. सत्राचे आभार प्रदर्शन लेखा व वित्त विभागाची विद्यार्थी अपूर्व अस्वले, तर सूत्रसंचालन प्रा. आलोक भानुशाली यांनी केले. याबरोबर रिटघर ग्रामपंचायत परिसरात विद्यार्थ्यांनी घरोघरी जाऊन सायबर गुन्हेगारी तथा प्रतिबंधात्मक उपाययोजना सांगणारे पत्रक वितरीत केले.

प्रा. अनिकेत सोनसुरकर, प्रा. आलोक भानुशाली, प्रा. करण कोळी, प्रा. स्नेहल खुस्पे आणि लेखा व वित्त विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली लेख व वित्त विभागाचे प्रमुख डॉ. निलेश कोळी, उपक्रम समन्वयक प्रा. अनिकेत सोनसुरकर, प्रा. आलोक भानुशाली, प्रा. करण कोळी, प्रा. स्नेहल खुस्पे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पनवेलमध्ये दिव्यांगांचे डिजिटल सर्वेक्षण

**खारघर : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या माध्यमातुन दिव्यांग धोरण ठरविण्याच्या दृष्टीने हालचालींना वेग आला आहे. मागील चार महिन्यांपासून याकरिता पालिका हद्दीत घरोघरी जाऊन नागरिकांचा सर्वेक्षण केले जात आहे. यामध्ये दिव्यांग तसेच ज्येष्ठ नागरिकांची माहिती गोळा केली जात आहे.

पनवेल पालिकेने केलेल्या सर्वेक्षणात आजतागायत ४९ हजार १८४ घरांना भेटी देऊन त्याठिकाणची माहिती गोळा करण्यात आली आहे. अद्यापही दीड लाख घरांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून यावर्षात ऑक्टोबर महिन्यापर्यंत पालिका हद्दीत हे सर्वेक्षण पुर्ण झालेले असेल अशी माहिति उपायुक्त रवीकरण घोडके यांनी दिली आहे. या डिजिटल सर्वेक्षणात पालिकेकडे कायमस्वरूपी नागरिकांची माहिती गोळा होणार आहे तसेच त्या माहितीच्या आधारे पालिकेला विविध योजना आखता येणार आहेत. प्रत्येक प्रभागात १० ते १५ जणांची टीम हि घरोघरी जाऊन सर्वेक्षण करीत आहे.

या सर्वेक्षणात नाव, मोबाईल नंबर, वय तसेच घरातील सर्वच सदस्यांची माहिती घेतली जात असल्याने भविष्यात पालिका या नागरिकांसोबत डिजिटल स्वरूपात जोडली जाणार आहे. पालिकेचे उपक्रम अथवा योजनांची माहिती पालिकेच्या माध्यमातून या नागरिकांना मोबाईलवर एसएमएसद्वारे उपलब्ध केली जाणार आहे.

राज्यात २०११च्या जनगणनेनुसार २९ लाख ६३ हजार दिव्यांग आहेत. एकूण लोकसंख्येच्या हे प्रमाण २.६ टक्के इतके आहे, मात्र ही संख्या निर्धारित करताना दिव्यांगत्वाचे केवळ सात प्रकार निश्चित करण्यात आले होते. राज्यात २०१६ मध्ये दिव्यांग व्यक्ती हक्क कायदा संमत करण्यात आला. त्यानुसार दिव्यांगत्वाचे प्रकार २१ करण्यात आले. सर्वेक्षणासाठी राज्य सरकारने जिल्हास्तरीय समितीची स्थापना केली आहे. त्यात जिल्ह्यासाठी जिल्हाधिकारी अध्यक्ष तर महापालिका स्तरावर महापालिकेचे आयुक्त अध्यक्ष म्हणून काम पाहतील. यासाठी प्रत्येक जिल्ह्याला एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**पालिकेच्या माध्यमातुन डिजिटल सर्वेक्षणाला सुरुवात करण्यात आली आहे. अद्यापपर्यंत एक हजार दिव्यांगांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. जवळपास ४९ हजार १८४ घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात आले आहे. यात दिव्यांग तसेच ज्येष्ठ नागरिकांची माहिती गोळा केली जात आहे.**
**–रविकरण घोडके, उपायुक्त, पनवेल महानगरपालिका**

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय आणि ‘सीकेटी’च्या विद्यार्थ्यांची विधीमंडळाला भेट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोडमधील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएसई स्कूल हे शिक्षण प्रदान करणारे प्रख्यात शैक्षणिक संस्थान असून येथील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विद्यार्थी केंद्रित उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. याचाच एक भाग म्हणून स्कूलचे चेअरमन परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली या विद्यालयातील इयत्ता सातवी आणि आठवीच्या ५८ विद्यार्थी व चार शिक्षकांच्या समूहाने महाराष्ट्र विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन व ग्रंथालयास भेट दिली.

या भेटीदरम्यान स्कूलच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अधिवेशन पाहण्याचा लाभ देण्यात आला ज्यातून विद्यार्थ्यांना कामकाजबद्दल तसेच विधानभवन वास्तू विविध मंत्री दालने त्यांचे कक्ष यांची माहिती देण्यात आली तसेच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना पाहण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना लाभला. त्यामुळे भावी पिढीला अत्यंत अभ्यासपूर्ण अशा कार्याचा लाभ घेता आला असून कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी विद्यार्थी व शिक्षकांशी संवाद साधला.

या वेळी विद्यार्थ्यांसमवेत मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, उपशिक्षक हर्षल फडके, उपशिक्षिका मनिषा मोरे आणि नेहा ठाकूर, उमेश पोद्दार आदी उपस्थित होते.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तरुणांचे राष्ट्र, जगातील सर्वात मोठी लोकशाही अशी बहुविध बिरुदे असणाऱ्या देशातील तरुणांमध्ये संसदीय लोकशाहीच्या मूल्यांचे रोपण करण्यासाठी तथा राज्य विधीमंडळाच्या विधीनिर्मिती प्रक्रियेबाबत महाविद्यालयीन व माध्यमिक विद्यार्थ्यांना जागरूक करण्यासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) स्वायत्त महाविद्यालयातील इंग्रजी माध्यमिक स्कूलमधील विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या चमूने सोमवारी (दि. १७) महाराष्ट्र विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला भेट दिली.



महाराष्ट्राचे विधानभवन ही सर्वांसाठी पवित्र वास्तू आहे. लोकशाहीचे महत्व आणि महानता या वास्तूच्या कानाकोपऱ्यातून जाणवते. विद्यमान आणि भावी पिढीला मार्गदर्शक असलेली अनेक ऋषीतुल्य माणसं या वास्तूनं बघितली, लोकशाहीची मूल्ये जोपासून राज्याला कायद्याच्या चौकटीत बांधणाऱ्या या कायदेमंडळाच्या इमारतीचे राजकीय नेत्यांना, कार्यकर्त्यांना जेवढं आकर्षण आहे तेवढंच समाजाच्या इतर घटकांनादेखील आहे आणि त्या अनुषंगाने राज्यातील विविध शाळा महाविद्यालयांतील विद्यार्थी, काही शिष्टमंडळे अभ्यास दौऱ्यांतर्गत येथे येत असतात. त्यानुसार विद्यार्थी व प्राध्यापकांच्या शिष्टमंडळाने विधीमंडळाच्या विधानसभा व विधान परिषदेचे कामकाज त्यांनी प्रेक्षक गॅलरीतून पाहिले.

या वेळी सभागृहात चालणाऱ्या कामकाजाची त्यांनी माहिती घेतली. दोन्ही सभागृहाचे कामकाज झाल्यानंतर लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या चमूसोबत मुक्त संवाद केला व अशा प्रकारच्या विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांच्या सातत्यपूर्ण आयोजनाबाबत शुभेच्छा दिल्या.

या वेळी विद्यार्थ्यांसमवेत सीकेटी महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.आकाश पाटील, भुगोल विभागाचे प्रमुख डॉ. दीपक नारखेडे, गणित विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुभाष उन्हाळे, अर्थशास्त्र वरिष्ठ प्राध्यापक काकासाहेब ढवळे, चांगू काना ठाकूर इंग्रजी माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षिका मनिषा नारखेडे, उमेश पोद्दार आदी उपस्थित होते.

# नवीन पनवेलमध्ये महिलांसाठी कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ओम प्रणायाम योगा क्लासेसच्या वतीने महिला दिनानिमित्त महिला संस्कृतीचे कलेतून दर्शन घडवण्यात आले. नवीन पनवेल रविवारी (दि.१६) आयोजित करण्यात अलेल्या या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



ओम प्रणाम योगा क्लासच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून योग शिक्षिका अलका आव्हाड यांच्या माध्यमातून नवीन पनवेलमधील कर्नाटक हॉलमध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन रविवारी केले होते. या कार्यक्रमाला भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, भाजप महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्षा राजश्री वावेकर, माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, संतोष शेट्टी, आर. पी. यादव आदी उपस्थित होते.



# विसपुते महाविद्यालयात टाकाऊपासून टिकाऊ स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षणाचे महत्त्व शालेय स्तरावरील तसेच महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बिंबवण्यासाठी पनवेल महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (दि.१६) डी.डी. विसपुते शिक्षणशास्त्र महाविद्यालयात टाकाऊ पासून टिकाऊ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.



माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरणाचे महत्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना समजावे यासाठी उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनूसार शाळा व महाविद्यालयांमध्ये शिबिरे, व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वृक्षारोपण, प्रश्नमंजूषा, चर्चासत्र, विविध खेळांचे आयोजन करण्यात येत आहेत. अभियानातील आकाश, जल, वायू, भूमी, अग्नि या महत्त्वाच्या घटकांनूसार डी.डी. विसपुते शिक्षणशास्त्र महाविद्यालयात टाकाऊपासून टिकाऊ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये विद्यार्थीनींनी घरातील टाकाऊ पदार्थापासून सुंदर अशा टिकाऊ व शोभेच्या वस्तू तयार करण्यात आल्या होत्या.

या कार्यक्रमास आदर्श शैक्षणिक समुहाचे अध्यक्ष धनराज विसतुते, महापालिकेच्या आरोग्य विभागाचे प्रमुख अनिल कोकरे, प्राचार्या डॉ. सीमा कांबळे उपस्थित होत्या. या वेळी उत्तम वस्तू तयार केलेल्या विद्यार्थीनींना प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

# निर्माल्य संकलनासाठी स्वतंत्र कचरा गाडीची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

निर्माल्य संकलनासाठी स्वतंत्र कचरा गाडीची व्यवस्था करण्याची मागणी हिंदवी सेनेच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबतचहे निवेदन पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांना सोमवारी (दि.१७) देण्यात आले.

हिंदवी सनेनच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पूजा आणि आरती झाल्यानंतर, वापरलेली फुले मंदिराच्या जवळ ठेवलेल्या फुलकुंडीत टाकण्यात येते. त्यानंतर ते निर्माल्य नियमित कचरा गाडीमध्ये टाकले जाते. निर्माल्य संकलनासाठी स्वतंत्र कचरा गाडीची व्यवस्था करावी.

जेणेकरून या पवित्र वस्तूंची योग्य प्रकारे विल्हेवाट लावता येईल. यामुळे पर्यावरणाचे रक्षण होईल आणि नागरिकांच्या धार्मिक भावनांचा आदर राखला जाईल असे अधोरेखीत करण्यात आले आहे. या वेळी पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील, अक्षया चितळे, शिल्पा पवार, अश्विनी मुरबाडकर उपस्थित होत्या.



# कामोठे येथे पाणपोईचे उद्घाटन



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

तिथीनुसार शिवजयंती व संकष्ट चतुर्थीचे औचित्य साधून पुरातन गणेश मंदिर, सेक्टर-३५, कामोठे येथे पाणपोईचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी उद्घाटन म्हणून माजी नगरसेवक विकास घरत, विजय चिपळेकर, प्रकाश पाटील, संतोष म्हात्रे व अनिल म्हात्रे आणि इतर मान्यवर व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाची इंडस्ट्रियल व्हिजिट

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातर्फे सोमवारी (दि.१७) एक दिवसीय सेवेज वॉटर ट्रीटमेंट प्लांट खारघर इंडस्ट्रियल व्हिजिटचे आयोजन केले होते.

या इंडस्ट्रियल व्हिजिटसाठी महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा प्रतिसाद दिला. या इंडस्ट्रियल व्हिजिटचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना सेवेज वॉटर ट्रीटमेंट प्लांटचा अनुभव घेता यावा हा होता.

प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या इंडस्ट्रियल व्हिजिटचे आयोजनाबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले. या व्हिजिटसाठी प्रा. डॉ. नीलम लोहकरे प्रा. डॉ. दीपिका हसीजा, प्रा. रूपाली नागरेकर, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



# गहाळ झालेले ४८ मोबाईल मालकांना सुपूर्द



**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत पनवेल तालुका पोलिसांनी सीईआयआर पोर्टलचा वापर करून गहाळ झालेले ४८ मोबाईल मुळ मालकांस परत केले आहेत.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) आनंद कांबळे यांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे पनवेल तालुका पोलीस ठाणे, नवी मुंबई हद्दीतील सन २०२५ माहे मार्चपर्यंतचे गहाळ झालेल्या मोबाईलपैकी एकूण ४८ मोबाईलचा सीईआयआर पोर्टलव्दारे शोध घेऊन विविध राज्यातुन एकुण ४८ मोबाईल ज्याची अंदाजे ५,७६,००० रुपये किंमतीचे हस्तगत करण्यात आले आहे. हस्तगत केलेले मोबाईल फोन हे तक्रारदार यांना पोलीस ठाणेस बोलावुन त्यांचे मोबाईल फोन त्याच्या ताब्यात दिले आहेत.

## संपादकीय

# या दुर्घटनांना रोखणार कसे?

गुजरातमध्ये होळीच्या दिवशी सुसाट वेगाने कार चालवून एका महिलेचा बळी घेणाऱ्या व आठ जणांना जखमी करणाऱ्या तरुणाच्या रक्तात अमलीपदार्थांचे अंश सापडल्याचे समोर आले आहे. या अपघाताने पुण्यातील पोर्श अपघाताची आठवण जागी झाली असून वडोदऱ्याच्या अपघातातील गाडी चालवणाऱ्या तरुणाच्या वर्तनामुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. तरुणांच्या बेफाम गाडी चालवण्यात किती निरपराधांचे बळी जाणार असा प्रश्न विचारला जातो आहे.

**गुजरातमधील वडोदरा येथील उच्चभ्रू वस्ती असलेल्या करेलीबाग परिसरात होळीच्या दिवशी म्हणजे गुरुवारी रात्री मध्यरात्रीच्या सुमारास एका भरधाव कारने रस्त्यावरील दोन स्कूटर आणि काही पायी चालणाऱ्या व्यक्तींना उडवले व अन्य एका मोटारीला धडक दिली. या दुर्घटनेत एका महिलेचा मृत्यू झाला तर आठ जण जखमी झाले. जखमींपैकी तिघांची प्रकृती गंभीर आहे. या दुर्घटनेचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर पसरले असून देशभरातील जनतेमध्ये त्यामुळे संतापाची प्रतिक्रिया उमटली आहे. दारू पिऊन, ड्रग्ज घेऊन रात्री-अपरात्री सुसाट वेगाने मोटारी पळवणारे हे तरुण आणखी किती निरपराधांचे बळी घेणार असा प्रश्न विचारला जातो आहे. अपघातग्रस्त फोक्सवॅगन कार चालवणारा रक्षित २३ वर्षांचा असून त्याच्या रक्तात ड्रग्ज सापडल्याची माहिती पोलिसांनी सोमवारी पत्रकारांना दिली. रक्षित चौरसिया हा लॉचा विद्यार्थी असल्याचे तर त्याचा मित्र प्रांसू चौहान हा मास कम्युनिकेशनचा विद्यार्थी आहे. दुर्घटनेनंतरचे आरोपी आणि कारचे व्हिडिओ गेल्या दोन दिवसांत समाजमाध्यमांवर वेगाने पसरले असून त्यातूनच अनेक बाबी समोर आल्या आहेत. अपघातात कारने एका स्कूटरला धडक देताच तिच्यावरील महिला उंच फेकली जाऊन खाली पडल्याचे स्पष्ट दिसते. धडकणारी कार थांबताच लगेचच कार चालवणाऱ्या तरुणाशेजारी बसलेला त्याचा मित्र, आपला याच्याशी काही संबंध नाही. हा (रक्षित) जबाबदार असल्याचे सांगत गाडीतून बाहेर पडला. रक्षितने आधी त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला व नंतर तो स्वत:ही गाडीतून बाहेर पडला व 'अनदर राऊंड, अनदर राऊंड' तसेच 'ओम नम: शिवाय' असे मोठ्याने ओरडत हिंडला. एका मुलीचे नावही त्याने घेतले. अपघातापूर्वी या दोघांसोबत असलेल्या अन्य एकाचाही पोलिस आता शोध घेत आहेत. अपघातानंतर स्थानिकांनी आरोपीला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. आरोपी रक्षित नशेच्या अंमलाखाली असल्याचे प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे होते. परंतु रक्षितने मात्र ते प्रारंभी स्वच्छ शब्दांत नाकारले. प्रांसू चौहानने तर घटनास्थळावरून पळच काढला. पोलिसांनी नंतर दोघांविरोधातही सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला. रक्षितविषयी अनेक बाबी समोर आल्या असून त्याला गेल्याच महिन्यात पोलिसांनी ताब्यात घेतले होते. परंतु दिलगिरी व्यक्त केल्यावर सोडून दिले होते. रक्षित आणि त्याच्या मित्रांविरोधात एका वकिलाने तक्रार दाखल केली होती. एका इमारतीत गोंधळ घालत असल्याने संबंधित वकिलाने त्यांना शांत राहण्यास सांगितले. परंतु रक्षितने उलट त्या वकिलालाच दमबाजी केल्याने वकिलाने पोलिसांत तक्रार केली व पोलिसांनी रक्षितला ताब्यात घेतले होते. अपघाताच्या व्हिडिओमध्येही त्याचा उद्दामपणा व विचित्र वर्तन लपून राहात नाही. त्याच्या रक्तात अंमलीपदार्थाचे अंश सापडले असले तरी न्यायालयात हा पुरावा म्हणून ग्राह्य धरला जाणार का याचीही चर्चा सुरू आहे. गुजरातमधील दुर्घटनेमुळे देशभरातील जनतेत संतापाची प्रतिक्रिया उमटली असून अशा दुर्घटना घडू नयेत यासाठी निश्चितच कठोर कारवाईची गरज आहे.**

# आधुनिक काळात समाजकार्य देखावा बनून राहू नये



जगातील महान समाजसुधारकांची नावे आपल्या मनात येताच, त्यांच्याबद्दल आदर आणि श्रद्धेने आपण भरून जातो, कारण त्यांनी लोकांच्या कल्याणासाठी संघर्षाचे जीवन जगले, अपार वेदना, दु:ख सहन केले आणि कठीण परिस्थितीशी झुंज दिली. स्वत:ची पर्वा न करता, त्यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत लोकांच्या हक्कांसाठी, मानवतेसाठी, समानतेसाठी, एकतेसाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी काम केले. त्यांना लोकांच्या समस्या आणि त्यांच्या वेदना जाणवल्या आणि त्या वेदना सुद्धा त्यांनी जगल्या. भेदभाव, जातीयवाद, लिंगभेद, वर्णव्यवस्था, अन्याय, सामाजिक विसंगती आणि कुप्रथा अशा अनेक वाईट गोष्टींचे उच्चाटन करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. आज प्रत्येक व्यक्तीला असलेले अधिकार हे त्या समाजसुधारकांच्या कठोर परिश्रमाचे फळ आहेत. प्राण्यांपेक्षाही वाईट परिस्थितीतून जात मानव आजच्या या स्थितीत पोहोचला आहे. अनादी काळापासून, सती प्रथा, देवदासी प्रथा, अस्पृश्यता, चेटकीण शिकार, बालविवाह, बहुपत्नीत्व, स्त्री जननेंद्रियाच्या विच्छेदनाची प्रथा, स्त्री भ्रूणहत्या यासारख्या भयानक प्रथा भारतात प्रचलित सामाजिक दुष्कृत्ये होती. मुलींच्या पालकांसाठी हुंडा हा आणखी एक प्रमुख चिंतेचा विषय होता, ज्यामुळे स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाणही वाढले. महिलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले होते, पितृसत्ताक व्यवस्था प्रबळ होती. खालच्या जाती आणि स्त्रियांना प्राण्यांपेक्षाही वाईट मानले जात असे. शतकानुशतके चालत आलेल्या अशा दुष्ट प्रथांचे अत्याचार आणि दडपशाही थोर समाजसुधारकांनी थांबवली. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी देशात स्त्री शिक्षणाची ज्योत पेटवली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कर्मचाऱ्यांना आणि महिलांना हक्क दिले आणि वंचितांना समान दर्जा दिला. पंडिता रमाबाईंनी बालविवाह थांबवण्यासाठी आणि महिला व विधवांच्या शिक्षणाला बळकटी देण्यासाठी काम केले. राजा राम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, भूदानचे प्रणेते विनोबा भावे, पेरियार ई.व्ही. रामास्वामी, कबीर, रविदास, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे, फातिमा शेख, स्वर्णकुमारी देवी, सिस्टर निवेदिता, कादंबिनी गांगुली, धोंडो केशव कर्वे, मदर तेरेसा, बाबा आमटे, सिंधुताई सपकाळ यांच्यापासून ते वर्तमानातील मेधा पाटकर, सुपर ३० चे आनंद कुमार, कैलाश सत्यार्थी, इरोम शर्मिला, सोनम वांगचुक सारखे अनेक त्यांच्या वेगवेगळ्या सामाजिक कार्यासाठी प्रसिद्ध आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे बाबा यांसारख्या अनेक संतांनीही देशाच्या सामाजिक विकासात अमूल्य योगदान दिले आहे. आजही, देशातील काही अनामिक सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांच्या कार्याद्वारे मानवता आणि समाजाचा विकास करण्यासाठी सर्वस्वाचा त्याग केला आहे. प्रत्येकजण स्वत:साठी जगतो, पण जे स्वत: अगोदर दुसऱ्यांचा विचार करतात, लोकांसाठी निस्वार्थपणे जगतात आणि जे स्वत:च्या प्रसिद्धीसाठी कधीही स्वत:चे रणशिंग वाजवत नाहीत त्यांना खरे समाजसेवक म्हणतात.

दरवर्षी मार्च महिन्याच्या तिसऱ्या मंगळवारी जगभरात जागतिक सामाजिक कार्य दिन साजरा केला जातो. या वर्षी २०२५ च्या जागतिक सामाजिक कार्य दिनाची थीम शाश्वत कल्याणासाठी आंतरपिढीय एकता मजबूत करणे आहे. ही थीम पिढ्यानपिढ्या एकमेकांची काळजी घेण्याचे आणि एकमेकांचा आदर करण्याचे महत्त्व अधोरेखित करते. सामाजिक कार्य जीवनात सुसंवाद, समता आणि मानवी विकास कल्याण यावर लक्ष केंद्रित करते. माणुसकीच्या नात्याने समाजातील प्रत्येक व्यक्तीमध्ये परोपकाराची भावना असली पाहिजे. थोर लोक नेहमी म्हणायचे की जर तुम्ही सामाजिक कार्य करताय किंवा नि:स्वार्थपणे लोकांना मदत केली तर कोणालाही ते कळू देवू नका, ते अशा प्रकारे करा, जेणेकरून सेवा घेणाऱ्या व्यक्तीला लाज किंवा संकोच वाटू नये आणि आपल्यात देखील अहंकार निर्माण होऊ नये. चांगली कर्मे करा आणि विसरून जा, आपण शरीराने, मनाने, पैशाने किंवा ज्ञानाने सक्षम असू, तर आपण कोणत्याही अपेक्षा न ठेवता आपल्या क्षमतेनुसार असहाय्यांना मदत केली पाहिजे. चांगल्या कामांचे नेहमीच कौतुक केले पाहिजे, जेणेकरून इतरांनाही प्रेरणा मिळेल, दिखाऊपणा अजिबात नसावा. माउंटेनमैन दशरथ मांझी, एक अत्यंत सामान्य वृद्ध, गरीब ग्रामीण कामगार, त्यांनी २२ वर्षांच्या अथक संघर्षातून एकट्याने डोंगर तोडून लोकांसाठी मार्ग तयार करून इतिहास रचला. त्यांचे कुटुंब गरिबीत जगले, परंतु त्यांनी कधीही कोणाकडूनही अपेक्षा केल्या नाहीत. आजही देशात आणि जगात असे अनेक सामाजिक कार्यकर्ते आहेत जे अगदी सामान्य जीवन जगतात पण त्यांचे कार्य असाधारण आहे. कधीकधी जेव्हा त्यांच्याबद्दल बातमी पाहायला-ऐकायला मिळते तेव्हा आपल्याला खूप अभिमान आणि समाधान वाटतो.

आजच्या काळात, प्रामाणिकपणे कष्ट करून पैसे कमवून असहाय्यांना मदत करणारा माणूस शोधणे खूप कठीण आहे. आपल्या देशात निवडणुकीच्या वेळी राजकारणी कोट्यवधी रुपये पाण्यासारखे खर्च करतात जेणेकरून निवडणूक जिंकल्यानंतर ते गरीब लोकांची नि:स्वार्थपणे सेवा करू शकतील. ते लोकांच्या कल्याणासाठी सर्वस्व त्याग करण्याबद्दल बोलतात, नेत्यांना पक्ष बदलावे लागले तरी ते असे स्पष्टीकरण देतात की, ते फक्त लोककल्याणासाठी असे करत आहेत, त्यांना कसलाही सत्तेचा लोभ नाही आहे. आजच्या आधुनिक वातावरणाकडे पाहिले तर, प्रत्येक क्षेत्रात, सर्वत्र सामाजिक कार्यकर्त्यांचा पूर आलेला आहे. कोणतीही व्यक्ती, कधीही, आपल्या नावापुढे सामाजिक कार्यकर्ता हा शब्द जोडतो आणि विविध कार्यक्रमादरम्यान, ते रस्त्याच्या चौकात, ट्रॅफिक सिग्नलवर, गल्लोगल्ली सामाजिक कार्यकर्त्यांच्या नावाने अनेक बॅनर-बोर्ड लावतात, वर्तमानपत्रांमध्ये त्यांचे संदेश प्रकाशित करतात. सध्या बॅनर-बोर्डांवर, सोशल मीडियावर अल्पवयीन मुले ही सामाजिक कार्यकर्ते म्हणून स्वत:चे फोटो लावतात. लोककल्याणासाठी नि:स्वार्थपणे काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांऐवजी आजकाल फक्त छायाचित्र काढणाऱ्या कार्यकर्तेच जास्त दिसून पडतात.

सर्व समाजसेवक, सामाजिक कार्यकर्ते किंवा आपणही, समाजाच्या समस्यांचे गांभीर्य समजून घेत आपल्या क्षमतेनुसार जागरूकता व नि:स्वार्थ सेवा करायला सुरुवात केली, तर देशातून प्रत्येक समस्या दूर होऊ शकते.

**-डॉ. प्रितम भि. गेडाम**

# प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग अंतर्गत रायगड जिल्ह्यातील उमेदवारांना बेरोजगार उमेदवारांसाठी प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेंतर्गत तरुणांना मोठ्या कंपन्यामध्ये इंटर्नशिपची संधी दिली जाणार आहे. युवक युवतींना ही रोजगाराची संधी आहे तसेच योजनेच्या दुसऱ्या फेरीसाठी पुन्हा अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. याकरिता ३१ मार्चपर्यंत अर्ज करता येणार आहे.

प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेंतर्गत उमेदवारांना १२ महिन्यांसाठी इंटर्नशिप मिळणार आहे. त्याकरिता दरमहा पाच हजार रुपये मिळणार आहेत. याशिवाय इंटर्नशिप पूर्ण झाल्यानंतर सहा हजार रुपये एकरकमी अनुदान दिले जाईल. या योजनेंतर्गत भारत सरकारकडून प्रत्येक प्रशिक्षणार्थींना प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत विमा संरक्षण दिले जाणार आहे. जिल्ह्यातील पात्र उमेदवारांनी http://pminternship.mca.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन आपली नोंदणी करावी.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त इच्छुक पात्र उमेदवारांनी याचा लाभ घेण्यासाठी http://pminternship.mca.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन आपली माहिती भरावी. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वैभव निवास, भंडार आळी, चेंढरे अलिबाग कार्यालयाच्या दुरध्वनी क्र.०२१४१-२२२०२९ आणि कार्यालयाचे चैतन्य कुलकर्णी (भ्रमणध्वनी क्र. ९०८२०३०६९२) यांच्याशी संपर्क साधावा.

**-संकलन जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग**



## बदलते तंत्रज्ञान

# सहा महिने वॅलिडीटीचा सर्वात स्वस्त प्लान

तुमच्यासाठी आज आम्ही एका खास रिचार्ज प्लॅनची माहिती घेऊन आलो आहोत. आम्हाला कल्पना आहे की, दर महिन्यात महागडे रिचार्ज प्लॅन घेऊन तुम्ही कंटाळला असाल. पण, चिंता करू नका. नेहमीप्रमाणे याही वेळी आम्ही तुमच्या फायद्याचा प्लॅन आणला आहे. तुम्हीदेखील महागड्या रिचार्ज प्लॅनला कंटाळला असाल आणि जास्त वॅलिडीटीचा प्लॅन शोधत असाल तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे.बीएसएनएलने एक नवीन रिचार्ज प्लॅन आणलाय. इङछङ ही देशातील सरकारी टेलिकॉम कंपनी आहे. स्वस्त आणि परवडणाऱ्या रिचार्ज प्लॅनच्या किंमतीत इङछङ त्यांच्या युजर्सना अनेक फायदे ऑफर करते. इतर टेलिकॉम कंपन्या त्यांच्या रिचार्ज प्लॅनच्या किंमतीत वाढ करत असतानाच इङछङ ने अनेक कमी किमतीचे रिचार्ज प्लॅन लाँच केले आहेत.




बीएसएनएलने यूजर्ससासाठी ७५० रुपयांचा नवीन प्लॅन आणून मोठा धमाका केलाय. बीएसएनएलच्या या रिचार्ज प्लॅनमध्ये ग्राहकांना १८० दिवसांची वैधता दिली जातेय. म्हणजेच तुम्ही या परवडणाऱ्या किंमतीत संपूर्ण सहा महिने रिचार्जच्या त्रासापासून मुक्त होऊ शकता. यामुळे मोबाईल क्रमांक बंद होण्याचे टेन्शनही संपेल. बीएसएनएलने त्यांच्या ऋझ२ यूजर्ससाठी हा रिचार्ज प्लॅन आणलाय. रिचार्ज प्लॅन संपल्यानंतर ७ दिवसांपर्यंत रिचार्ज करत नाहीत, ते जीपी२ अंतर्गत येतात.

बीएसएनएलच्या ७५० रुपयांच्या प्लॅनचे काय फायदे आहेत, याबद्दल सविस्तर जाणून घेऊया. या प्लानमध्ये ग्राहकांना १८० दिवसांसाठी अनलिमिटेड मोफत कॉलिंग मिळेल. यासोबतच कंपनी सर्व स्थानिक आणि एसटीडी नेटवर्कसाठी दररोज १०० मोफत एसएमएस मिळतायत. या प्लॅनद्वारे तुम्ही कोणत्याही टेन्शनशिवाय दररोज अनलिमिटेड कॉलिंग करू शकता. यामध्ये तुम्हाला १८० दिवसांच्या वॅलिडीटीसाठी १८० जीबी डेटा मिळतो. म्हणजेच तुम्ही या प्लॅनमध्ये दररोज १ जीबी पर्यंत हाय स्पीड इंटरनेट डेटा वापरू शकता. दैनंदिन डेटा मर्यादा संपल्यानंतरही तुम्ही इंटरनेट वापरू शकाल. पण या काळात तुम्हाला फक्त ४०ज्ञ्ली्िच्या वेगाने डेटा कनेक्टिव्हिटी मिळेल.

# जगातील एक सर्वोत्तम फिल्डर एकनाथ सोलकर



## निमित्त

मुंबई येथे १८ मार्च १९४८ रोजी जन्मलेले एकनाथ धोंडू सोलकर हे एका गरीब कुटुंबातून आले होते. त्यांचे वडील मुंबईतील हिंदू जिमखाना येथे ग्रांउन्ड्समन होते. त्या वेळी सोलकर हे त्यांच्या वडिलांसोबत क्रिकेटच्या सामन्यादरम्यान धावफलक बदलण्याचे काम करत असत. १९६० आणि १९७०च्या दशकात त्यांच्या अपवादात्मक क्षेत्ररक्षण कौशल्यासाठी आणि संघातील योगदानासाठी ओळखले जाणारे एक भारतीय क्रिकेटपटू होते. सोलकर हे केवळ एक विश्वासार्ह अष्टपैलू खेळाडू नव्हते; तर भारताच्या क्रिकेट इतिहासातील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्व होते.

१९६९मध्ये इंग्लंडविरुद्ध भारताकडून सोलकरने कसोटी पदार्पण केले आणि मैदानावर एक प्रतिष्ठित खेळाडू म्हणून स्वत:ला स्थापित करण्यास त्याला जास्त वेळ लागला नाही. फलंदाज आणि मध्यमगती गोलंदाज म्हणून त्याची प्राथमिक भूमिका त्याच्या उत्कृष्ट क्षेत्ररक्षण क्षमतेने पूरक होती, ज्यामुळे तो खेळाच्या तिन्ही पैलूंमध्ये एक संपत्ती बनला. एकनाथ सोलकर यांच्या कारकिर्दीतील एक निर्णायक क्षण १९७१च्या इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत आला. त्यांच्या कामगिरीने, विशेषत: बॅटने आणि फिल्डिंगमध्ये, इंग्लंडमध्ये भारताच्या ऐतिहासिक कसोटी मालिकेच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. सोलकर यांनी लवचिकता आणि दृढनिश्चय दाखवला, बॅटने महत्त्वपूर्ण धावा केल्या आणि काही उत्कृष्ट झेल घेतले ज्यामुळे सामन्यांचा कल बदलला.

सोलकरचा निर्भय दृष्टिकोन आणि आव्हानात्मक परिस्थितींना तोंड देण्याची तयारी यामुळे तो क्रिकेटप्रेमींमध्ये आवडता खेळाडू बनला. त्याच्या खेळण्याच्या शैलीने कधीही हार न मानण्याची वृत्ती दर्शविली आणि खेळाला त्याच्या संघाच्या बाजूने वळवण्याची त्याची क्षमता त्याला क्रिकेट जगतात प्रचंड आदर मिळवून देत असे.

सोलकर यांच्या कसोटी कारकिर्दीत, त्यांच्या मध्यमगती गोलंदाजीने मौल्यवान धावा केल्या आणि विकेट्स घेतल्या. तथापि, त्याच्या क्षेत्ररक्षणाने त्याला खरोखर वेगळे केले. सोलकर त्याच्या ॲक्रोबॅटिक कॅच आणि मैदानावर चपळ हालचालींसाठी ओळखला जात असे, ज्यामुळे क्रिकेटपटूंच्या पिढ्यांना खेळाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणून क्षेत्ररक्षणाला प्राधान्य देण्यास प्रेरणा मिळाली.

एकनाथ सोलकर यांची आंतरराष्ट्रीय कारकीर्द १९६९ ते १९७७पर्यंत होती, त्या काळात त्यांनी २७ कसोटी सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. त्यांच्या खेळण्याच्या कारकिर्दीनंतर, सोलकर यांनी प्रशिक्षकपदाकडे वळले आणि त्यांनी त्यांचे ज्ञान आणि अनुभव इच्छुक क्रिकेटपटूंसोबत शेअर केले.एकनाथ सोलकर हे भारतीय क्रिकेटमधील एक दिग्गज व्यक्तिमत्व आहेत, जे केवळ त्यांच्या मैदानावरील कामगिरीसाठीच नव्हे तर क्षेत्ररक्षणाच्या महत्त्वाबद्दल भारतीय क्रिकेटपटूंच्या मानसिकतेवर पडणाऱ्या प्रभावासाठी देखील लक्षात ठेवले जातात. त्यांचे योगदान आणि त्यांचा वारसा भावी क्रिकेटपटूंच्या पिढ्यांसाठी प्रेरणा म्हणून जिवंत आहे. सोलकर यांचा मधुमेहामुळे वयाच्या ५७व्या वर्षी २६ जून २००५ रोजी मृत्यू झाला. **(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# चहासोबत 'हे' पदार्थ चुकूनही खाऊ नका!

जगात करोडो चहा प्रेमी आहेत. चहा हे असे पेय आहे, ज्याशिवाय अनेक लोकांच्या दिवसाची सुरुवात होत नाही. भारतातील सर्वात आवडता चहा म्हणजे दुधाचा चहा. या चहामध्ये पाणी, आले, वेलची आणि दालचिनी वापरली जाते. अनेक जण दिवसातून दोन-तीन कप चहा पितात. चहासोबत अनेकांना बिस्किट, खारी, टोस्ट इत्यादी खायला आवडते. पण चहासोबत काही पदार्थांचे सेवन करणे टाळावे. चहासोबत या पदार्थांचे सेवन करणं टाळा. सकाळ असो वा संध्याकाळ, अनेक भारतीय घरांमध्ये नाश्त्यासोबत चहा पिणे ही एक परंपराच आहे. आणि बहुतेकवेळा नाश्त्याला तळलेले पदार्थ असतात. हे तळलेले पदार्थ आधीच आरोग्यासाठी हानिकारक म्हणून ओळखले जातात, परंतु चहासोबत ते खाल्ल्याने पचन आणि पोषक तत्वांच्या शोषणावर अधिक परिणाम होऊ शकतो. मुंबईतील पोषणतज्ज्ञ वेदिका प्रेमानी यासंदर्भात सांगतात की, योग्य प्रमाणात चहा पिणे हाणीकारक नाही पण त्यासोबतच तळलेले पदार्थ खाणे शरिरासाठी हाणीकारक ठरु शकतात. चहामध्ये टॅनिन आणि ऑक्सलेट असतात जे लोह आणि कॅल्शियम सारख्या पोषक तत्वांनी समृद्ध असलेल्या अन्न स्त्रोतांसह सेवन केल्यास त्यांचे शोषण कमी होते. शिवाय, वारंवार गरम केलेल्या तेलात तळलेले पकोडे खाल्ल्याने ट्रान्स फॅटी ॲसिडचे उत्पादन होते,



चहासोबत अनेकजण बिस्किटे आणि कुकीज खातात. ज्यामध्ये चरबी आणि साखरेचे प्रमाण जास्त असते ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते.चहासोबत खाल्ला जाणारा आणखी एक लोकप्रिय नाश्ता म्हणजे समोसा ज्यामध्ये चरबीचे प्रमाण जास्त असते. ब्रेडसारखे इतर बेकरी उत्पादने देखील चहासोबत खाणे योग्य नाही कारण त्यात सोडियम, साखर आणि फॅटी ॲसिडचे प्रमाण जास्त असते. मात्र आरोग्यदायी नाश्त्याच्या पर्यायांमध्ये तुम्ही ढोकळा, मखाना, चना चाट आणी खाकरा यासह रागी चिप्सचा समावेश करु शकता.

डेअरी प्रोडक्ट्स - चहासोबत दूध, पनीर किंवा मलई इत्यादी दुग्धजन्य पदार्थांचे सेवन केल्याने चहामध्ये आढळणारे पॉलीफेनॉलचा परिणाम शरीरावर होत नाही.

चहा पिताना हिरव्या पालेभाज्या, मसूर, धान्ये यांसारखे लोहयुक्त पदार्थ खाणे टाळावे.

# एक्स्प्रेस वेवर शिवशाही बसची टँकरला धडक

## चालकसह तीन प्रवासी जखमी

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर सोमवारी (दि. १७) दुपारी एकच्या सुमारास शिवशाही बसने केमिकलच्या टँकरला मागून जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला या अपघातात चालकासह अन्य दोन प्रवासी जखमी झाले आहेत.



मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरून शिवशाही बस मुबंई हुन पुण्याकडे प्रवाशी घेऊन जातं असताना ती खालापूर टोल नाक्याजवळ आली असता चालकाचे बस वरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील केमिकल घेऊन जाणाऱ्या टँकरला पाठीमागून जोरदार धडक दिली, या अपघातात टँकर मधिल एचसीएल नावाचे अॅसीड लिकेज झाले होते,

या घटनेची माहिती तत्काळ मिळताच आयआरबी पेट्रोलिंग, देवदूत, यंत्रणा, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल, अपघातग्रस्त टीमचे सदस्य, खालापूर पोलीस, महामार्ग पोलीस, आदी तात्काळ घटनास्थळी दाखल होत बस मधील अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढून केबिन मध्ये अडकलेल्या चालकासह बस मधील प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आले,

नंतर केमिकल एक्सपर्ट धनंजय गिध यांना तात्काळ बोलावून वॉल बदली केल्यानंतर केमिकल गळतीवर नियंत्रण आणल्याने मोठी दुर्घटना टळली, शिवशाही बस मधील बाकी प्रवासी सुखरूप आहेत. या घटनेबाबत खालापूर पोलीस तपास करीत आहे.

# ऑलिव्ह रिडले कासवांची ८९ पिल्ले झेपावली हरिहरेश्वर समुद्रात





**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

समुद्रातील एक अनमोल धरोहर, ऑलिव्ह रिडले समुद्री कासवांची पिल्ले यंदा हरिहरेश्वर समुद्रकिनाऱ्यावर स्वतंत्रपणे जीवनाच्या दिशेने झेपावली आहेत. या कासवांची पिल्ले शंभरातल्या ८९ पिल्लांसह, दोन दिवसांच्या कालावधीत श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर समुद्रात सोडण्यात आली. यंदाच्या हंगामात २२ वर्षांपासून सुरू असलेल्या कासव संवर्धन मोहिमेचा हा एक भाग आहे.

कोकण किनारपट्टीवरील विविध समुद्रकिनाऱ्यांवर वन विभाग, पर्यावरणप्रेमी, आणि स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने ही संवर्धन मोहीम राबवली जात आहे. २००२पासून या कासवांच्या संरक्षणासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले होते आणि आज त्याला २२ वर्षांचा इतिहास आहे.

समुद्र किनाऱ्यावर मादी कासवाच्या अंडी देण्याच्या प्रक्रियेपासून ते त्या अंड्यांपासून कासवांची पिल्ले समुद्राच्या पाण्यात सोडण्यापर्यंत अनेक महत्त्वाचे टप्पे पार पडतात. समुद्र किनाऱ्यावर १५ ते २० वर्षांपासून या मोहिमेची चळवळ सुरू आहे. तथापि, वाळूमध्ये घरटं तयार करण्याच्या कार्यात असलेला धोका आणि समुद्राच्या भरतीच्या परिणामामुळे कासवांची पिल्ले सुरक्षित ठेवण्यासाठी तज्ज्ञ कासव मित्रांनी विशेष काळजी घेतली आहे.

गेल्या काही वर्षांत, वातावरणीय बदलांमुळे मादी कासवांच्या अंड्यांचे प्रमाण २००-२५० वरून घटून १००-१५० पर्यंत पोहोचले आहे. तथापि, वन विभागाच्या सक्रिय जनजागृतीमुळे कासव संवर्धनाच्या या चळवळीला एक नवा गती प्राप्त होईल, अशी आशा आहे. या महत्त्वाच्या प्रक्रियेतील प्रत्येक पाऊल कासवांच्या भविष्यावर मोठा परिणाम करतो.

समुद्राच्या अथांग पाण्यात असलेल्या या सजीवांसाठी, या चळवळीचा दीर्घकालीन परिणाम असावा, अशी अपेक्षा सर्व निसर्गप्रेमी आणि कासव संरक्षणकर्त्यांमध्ये आहे.

गेल्या ६०-७० वर्षांच्या काळात रायगड जिल्ह्यात मादी कासव अंडी घालण्यासाठी अत्यल्प प्रमाणात किनाऱ्यांवर येत होत्या. श्रीवर्धन तालुक्यात काही ठराविक किनारेच निवडक कासवांसाठी सुरक्षित ठरले होते. मात्र, ग्रामस्थ, पर्यावरणप्रेमी, वन विभाग आणि इतर संस्थांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे रायगड जिल्ह्यात कासवांसाठी अंडी घालण्याच्या ठिकाणांची सुरक्षा सुनिश्चित करण्यात आली. स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त किनाऱ्यांचे संरक्षण करत या वर्षी या प्रयत्नांना अपेक्षित यश मिळाले असल्याचे कांदळवन कक्ष, वनक्षेत्रपाल समीर शिंदे यांनी सांगितले.


## जाहीर नोटीस

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ खाली दाखल दावा नोटीस महात्मा फुले को. ऑप. के. सो. लि., पनवेल या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्ती विरूध्द थकीत कर्जाचा भरणा केला नसल्याने नमूद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापि खालील नमूद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणणे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटीसीव्दारे आपणांस पुन्हा एक संधी देण्यात ये असून सदर दाव्याबाबत अंतिम सुनावणी दिनांक ०८/०४/२०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता ठेवण्यात आली असुन सदर सुनावणीस आपण स्वतः वा आपले प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहवे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निर्णय दिला जाईल.

| अ.क्र. | दावा क्र. | प्रतिवादीचे नाव | पत्ता | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २६७/२०२४-२५ | श्री. राजेश सदाशिव महाडीक. (कर्जदार) | गायत्री ईला, प्लॉट नं. ५६, सी, सेक्टर-३, तिसरा माळा, करंजाडे, ता. पनवेल, जि. रायगड | २,२७,२१५/- |
| | | श्री. नजमुद्दीन अबुमियाँ पटेल. (श्री. राजेश सदाशिव महाडीक, कर्जदार यांचे जामिनदार) | घर क्र. ७७३, तळोजा जामा मस्जिदजवळ, ता. पनवेल, जि. रायगड. | |
| | | श्री. मेहबुब मोहमद आलमेल. (श्री. राजेश सदाशिव महाडीक, कर्जदार यांचे जामिनदार) | साई शिवम सोसायटी, रूम नं. ३, प्लॉट क्र. डी/३३, सेक्टर ६, खांदा कॉलनी, ता. पनवेल. | |
| २. | २६८/२०२४-२५ | श्री. राकेश काळुराम भोईर (कर्जदार) | मु. उसर्ली खुर्द, पो. ओ.एन.जी.सी., ता.पनवेल | २,८०,६३६/- |
| | | श्री. नईम अब्दुल रौफ सय्यद. (श्री. राकेश काळुराम भोईर, कर्जदार यांचे जामिनदार) | घर क्र. ५१९, मुस्लिम मोहल्ला, वडघर, ता. पनवेल, जि. रायगड | |
| | | श्री. गिरीष चंद्रकांत जगे (श्री. राकेश काळुराम भोईर, कर्जदार यांचे जामिनदार) | रूम नं. १०५, लक्ष्मी वसाहत, कोहिनूर टेक्निकल जवळ, ता. पनवेल, जि. रायगड. | |
| ३. | २६९/२०२४-२५ | श्री. अमोल गणेश गोवारी. (कर्जदार) | घर नं. ३५६ / बी, भिंगारी, ओ.इन.जी.सी., ता.पनवेल, जि. रायगड | २,४८,२५५/- |
| | | श्री. मो. आसिफ मो. शरीफ पठाण. (श्री. अमोल गणेश गोवारी, कर्जदार यांचे जामिनदार) | घर क. ४६, बंदर रोड, पीर करम आली साह दर्गा, ता. पनवेल, जि. रायगड | |
| | | श्री. सिराज सत्तार शेख. (श्री. अमोल गणेश गोवारी, कर्जदार यांचे जामिनदार) | घर नं. १४४, भारत नगर, पटेल मोहल्ला, ता. पनवेल, जि. रायगड. | |
| ४. | २६४/२०२४-२५ | श्री. सद्दाम जुम्मादिन पटेल. (कर्जदार) | फ्लॅट नं. ४०२, श्री. अनिरूध्द अपार्टमेंट, प्लॉटनं. ३४, सेक्टर- ९, नवी मुंबई, कामोठे | १,१७,५३४/- |
| | | श्री. बिपीन बबन शेटये. (श्री.सद्दाम जुम्मादिन पटेल, कर्जदार यांचे जामिनदार) | फ्लॅट नं. २०७, बी विंग, दाता रेसिडन्सी, सेंट मेरी शाळेजवळ, खालापूर, रायगड | |
| | | श्री. धनंजय किशोर म्हात्रे. (श्री. सद्दाम जुम्मादिन पटेल, कर्जदार यांचे जामिनदार) | घर नं. ३००, राधा कृपा, दापोली गाव, गौरी मेडिकलच्या बाजुला, ता. पनवेल. | |
| ५. | २६५/२०२४-२५ | श्री. विकास ओमप्रकाश गुप्ता. (कर्जदार) | बी/ ३०२, हरी महादेव रेसिडन्सी, प्लॉट नं. १०३५/ अ-२, उरण नाका, पनवेल, रायगड | १,१२,०००/- |
| | | श्री. गणेश मोहन गुप्ता. (श्री.विकास ओमप्रकाश गुप्ता, कर्जदार यांचे जामिनदार) | प्रजापती कॉम्प्लेक्स, फ्लॅट नं. ४०४, प्लॉट नं. २०२, ए विंग, पनवेल, रायगड- ४१०२०६. | |
| | | श्री. राजकुमार दुर्गाप्रसाद गुप्ता. (श्री.विकास ओमप्रकाश गुप्ता, कर्जदार यांचे जामिनदार) | प्लॅट क्र. १०३, जय प्राची होम, सेक्टर २१, कामोठे, नवी मुंबई - ४१०२०९ | |
| ६. | २६६/२०२४-२५ | सौ. अश्विनी निनाद गांधले. (कर्जदार) | डी/४०२, क्वालिटास गार्डन, कोर्णाक सिटीजवळ, कोपरोली, पनवेल, रायगड- ४१०२०६ | १,१६,३९६/- |
| | | श्री. राहूल महादेव शिरसाट, (सौ. अश्विनी निनाद गांधले, कर्जदार यांचे जामिनदार) | श्रीजी अपार्टमेंट, रूम नं. २०१, २ रा माळा, हिंदमाता शाळेजवळ, दिघा, ठाणे. | |
| | | श्री. किरण बाबुलाल निकम. (सौ. अश्विनी निनाद गांधले, कर्जदार यांचे जामिनदार) | फ्लॅट क्र. ४०३, प्लॉट नं.०८, शंकर अपार्टमेंट, उत्कर्ष हॉल समोर, से - १२, खारघर | |

सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली असे.
स्थळ : पनवेल
दिनांक : १७ /०३/ २०२५
जावक क्र.:- ०७८९/२०२५

शिक्का

सही/-
(श्रीम. भारती काटुळे )
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था पनवेल, जि. रायगड


# रेल्वेची ठोकर लागून युवकाचा मृत्यू

## माणगाव रेल्वेस्थानकाजवळील घटना




**माणगाव : प्रतिनिधी**

रेल्वेची धडक लागून ३२ वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याची घटना माणगावमध्ये घडली आहे.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सविस्तर वृत्त असे की, दि. १७ मार्च रोजी माणगाव रेल्वे स्थानक पासून ४०० मीटर अंतरावर मयत सुशांत मंगेश गायकवाड, वय ३२ वर्ष, रा. मैत्री पार्क, दत्तनगर, माणगाव याला रेल्वेची धडक लागल्याने हातापायास गंभीर दुखापत झाली होती. त्यास उपचाराकरीता उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे दाखल केले असता उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला.

या घटनेची नोंद माणगाव पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास स. पो. नि. बेलदार करीत आहेत.


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **कल्पेश गजानन पाटील व इतर** यांनी आमच्या अशिलांना समती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे विंधणे (५५३३२४)**
**(PU-ID: 15050913521), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १६७/४ खाते क्रमांक १०५१४ | २ | ०.३४.०० पो.ख. ०.००.०० एकुण ०.३४.०० | १.३७ |

**एकुण क्षेत्र ०.३४.०० गुंठयाचे खरेदीखत**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १७/०३/२०२५

सही/-
**अॅड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी. एच. एस. भूखंड क्रमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा -- रायगड ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१



## पनवेल महानगरपालिका

तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड

**पाणी पुरवठा विभाग**

**''नागरिकांना जाहीर आवाहन''**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, शहरास होणारा पाणी पुरवठा हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळ व देहरंग धरण मिळून एकत्रितपणे करण्यात येतो. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळ या संस्थेस पाताळगंगा नदीतुन दर रविवार व सोमवार या दिवशी कमी पाणी मिळते व इतर काळात इलेक्ट्रिक शटडाऊन, ब्रेकडाऊनमुळे दोन्ही संस्थेकडून वारंवार कमी पाणी मिळत असल्याने देहरंग धरणाचे जास्त पाणी घेवून शहराची दररोजची गरज भागविण्यात येते. परंतु त्यामुळे धरणातील पाणीसाठा कमी झाला, ही वस्तूस्थिती विचारात घेता धरणातील शिल्लक असलेला पाणीसाठा माहे १५ जून २०२५ पर्यंत पुरविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या दृष्टीने **गुरुवार दि. २०/०३/२०२५** रोजीपासून पनवेल शहरामध्ये उंच जलकुंभ निहाय एक भाग आठवडयातून एक दिवस बंद ठेवण्यात येणार आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. क्र. | वार | उंच जलकुंभाचे ठिकाण | पाणीपुरवठा बंद राहणारा भाग | पाणीपुरवठा सुरु राहणाऱ्या भागाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | शुक्रवार | गोल टाकी (WTP) | मिडलक्लास हो. सोसा भाग -१ व २, एस के बजाज भाग बंद राहिल | --- |
| २ | शनिवार | गंगाराम सिनेमा उंच जलकुंभ | तक्का गाव व कॉलनी भाग बंद राहील. | --- |
| ३ | रविवार | -- | शहरातील सर्वभागात पाणीपुरवठा सुरू राहील. | शहरातील सर्वभागात पाणीपुरवठा सुरु राहील |
| ४ | सोमवार | १) मार्केटयार्ड उंच जलकुंभ<br>२) भाजी मार्केट उंच जलकुंभ<br>३) चौकोनी टाकी (WTP) | संपुर्ण भाग बंद राहील<br>संपुर्ण भाग बंद राहील<br>१) पटेल पार्क, जैन मंदीर, गणपती मंदीर<br>२) मामलेदार कचेरी ते दत्तराज सो.. साठेगल्ली ते विरुपाक्ष मंदीर, सिटी स्टोअर, सिनीयर ज्यूनियर गल्ली, आगरी समाज हॉल ते घोडके हॉस्पिटल, गायकर गल्ली बैठे घर, शुभलाभ सो. ते सहयोग नगर, सुतिका गृह ते यशोमंगल सो., उमाशंकर सो. ते यशोवर्धन सो., आदर्श हॉटेल ते रत्नेश सो., कुबेर सो. ते शुभलाभ सो., धुतपापेश्वर कारखाना ते मुनोथ नगर, मुनोथनगर ई विंग, पिन्स पॅराडाईज सो.. सनराईज सोसा, जोशी आळी इत्यादी.<br>३) पंचायत समिती झोपडपट्टी, कोहिनुर टेक्निकल ते किंग्ज इलेक्ट्रॉनिक्स, कोहिनुर टेक्निकल ते नवनाथ मंदीर, लक्ष्मी वसाहत. | ---<br>---<br>---<br>माणिक नगर,अशोक गार्डन, केशवबाग,स्नेहसदन सो., यशोदिप, शिवसेना कार्यालय, भैरवनाथ डेअरी, मांडवकरवाडा, गुढेकर डेअरीते रेखी हॉटेल पर्यंत, घाटेआळी, गावदेवी पाडा, परदेशी आळी, गुढेकर डेअरी ते खुटकर मटण शॉप, वैद्य ते श्रीलॉज् पर्यंत, गुणे हॉस्पिटल ते लाईफ लाईन हॉस्पिटल ते खुटकर मटण शॉप इत्यादी<br>२) दांडेकर हॉस्पिटल ते श्री. अच्युत मनोरे घरापर्यंत, गुडेकर डेअरी ते घोडके हॉस्पिटल, परदेशी आळी बैठी घरे, रत्नारेसिडेन्सी सो.. अष्टविनायक कॉलनी, गुणे हॉस्पिटल ते शिवाजी महाराज पुतळ्या पर्यंत, श्री लॉज ते निलेठा गार्डन पर्यंत, सुभेदार वाडा, आदर्श हॉटेल ते शिवाजी महाराज पुतळ्या पर्यंत, यशोपुरम सो., जूना पोष्ट बाजू, मुनोथ नगर A,B, विंग<br>३) जयभारत नाका ते भिडे घरापर्यंत. गांगल वाडा, महाड बँक. आदर्श हॉटेल ते जयभारत नाका, गोडसे आळी, विरुपाक्ष मंदीर ते दगडी शाळा, मनिष मार्केट, अन्नपुर्णा ते निसर्ग बिल्डींग, त्रिमुर्ती सहनिवास, कापड बाजार, गोखले हॉल ते प्रज्ञा सो., रतन टॉकीज परिसर इत्यादी. |
| ५ | मंगळवार | १) पटेल मोहल्ला उंच जलकुंभ<br>२) पायोनिअर उंच जलकुंभ | संपुर्ण भाग बंद राहील.<br>पायोनिअर सोसायटी जलकुंभातुन होणारा पाणी पुरवठा व ठाणा रोड बंद राहील. | --- |
| ६ | बुधवार | एचओसीउंच जलकुंभ | संपुर्ण भाग बंद राहील. | --- |
| ७ | गुरुवार | ठाणा नाका उंच जलकुंभ् | संपुर्ण साईनगर भाग बंद राहील. | --- |

टिप :- उपरोक्त प्रमाणे उपलब्ध पाणीपुरवठयानुसार पाणी वितरणाच्या वेळेमध्ये वेळोवेळी बदल करण्यात येईल.

दिनांक : १७/०३/२०२५

सही/-
**अभियंता, पायाभूत सोई सुविधा**
पनवेल महानगरपालिका

सही/-
**उप अभियंता (पापु)**
पनवेल महानगरपालिका


# पं. दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यासंदर्भात आवाहन

**अलिबाग : रामप्रहर वृत**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग व पातळगंगा आणि रसायनी इंडस्ट्रीज असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२७ मार्च रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ०२.०० या वेळेत पातळगंगा आणि रसायनी इंडस्ट्रीज शाळा, पी २३ एम.आय.डी.सी. निवासी परिसर, मोहपाडा ता. खालापूर जि. रायगड येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा व मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना (इंटर्नशिप) उमेदवार निवड मेळावा आयोजित केला आहे. या रोजगार मेळाव्याकरीता रायगड जिल्ह्यातील खाजगी आस्थापनांना रिक्तपदे अधिसूचित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यातील सर्व खाजगी उद्योजकांनी आपल्या आास्थापनेतील कुशल/अकुशल रिक्तपदे या कार्यालयास कळविण्यात यावीत तसेच शासनाच्या माध्यमातून खाजगी कंपन्यातील जास्तीत-जास्त रिक्तपदे रोजगार मेळाव्यातून भरती करण्यात येणार आहे. याकरिता संकेतस्थळ https://rojgar.mahaswayam.gov.


महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग,

## कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचे कार्यालय

रायगड विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग रायगड, सार्वजनिक बांधकाम आवार-पेण, ता. पेण, जि. रायगड, पिन - ४०२१०७
Email : elraigad.ee@mahapwd.gov.in / elraigad.ee@gmail.com Website : www.mahapwd.gov.in

जा क्र. का.अ./राविवि/निविदा-१/९७९/सन २०२५ दुरध्वनी क्र.: ०२१४३-२९९२८८

### ई-निविदा सूचना क्र. ३० सन २०२४-२५

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन सा. बां. विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती-२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८
२. मा. मुख्य अभियंता, सा.बां. विभाग कोकण, मुंबई यांचे पत्र क्र.मु.अ.(को)/ विद्युत/४९२८/२०२४ दि.१८.१२.२०२४
३. महाराष्ट्र शासन सा.बां. विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. संकिर्ण- २०२२/प्र.क्र.१०४/इमा-२ दिनांक १४.०२.२०२५

**कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर- पेण, ता. पेण, जि. रायगड, पिन कोड - ४०२१०७ दुरध्वनी क्र. ०२१४३- २९९२८८** हे संदर्भाचे अधिन राहुन महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील नोंदणीकृत अनुज्ञाप्तीधारक कंत्राटदाराकडून खालील कामांकरीता ब- १ नमुन्यातील निविदा, ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, **रायगड विद्युत विभाग, सा. बां. रायगड** यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रु. | ई-निविदा उपलब्ध कालावधी | निविदापूर्व बैठक/ठेकेदारांचा वर्ग/ इसारा रक्कम/कोरा निविदा शुल्क | ई-निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| | | | द्वितीय मागणी | | |
| 1 | RAED/OW/93/2024-25 Providing G plus 2 Stretcher Lift 20 Passanger with EI in rural hospital at Pali, Tal- Sudhagad-Pali, Dist-Raigad. | रु. 46,71,401/- | दिनांक १७.०३.२०२५ सकाळी १०.०० वाजेपासून दिनांक २४.०३.२०२५ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत | १) निविदापूर्व बैठक नाही. २) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. ३) इसारा रक्कम रु.४६८००/- ४) निविदा शुल्क रु.५००/- अधीक GST | दिनांक २६.०३.२०२५ सकाळी ११.०० |
| 2 | Est. No. RESD/OW/958/2023-24 (Subwork I to III) Providing strengthing and -llied Repair works for Existing Old Electrical Installation,solar water heater,pump, at Hydraulic Lab,canteen and Record Room in premises of Government Polytechnic collage main Building Ratnagiri Tal & Dist Ratnagiri. | रु. 71,01,955/- | दिनांक १७.०३.२०२५ सकाळी १०.०० वाजेपासून दिनांक २४.०३.२०२५ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत | १) निविदापूर्व बैठक नाही. २) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. ३) इसारा रक्कम रु.७११००/- ४) निविदा शुल्क रु.१०००/- अधीक GST | दिनांक २६.०३.२०२५ सकाळी ११.०० |

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. https://mahatenders.gov.in (सदर निविदासुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)
२. कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर- पेण, ता. पेण, जि. रायगड, पिन कोड - ४०२१०७ दुरध्वनी क्र. ०२१४३-२९९२८८ या कार्यालयातील सुचना फलक
३. वरील कामांकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये नोंदणीकृत विद्युत ठेकेदार व उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील विद्युत अनुज्ञाप्तीधारक विद्युत ठेकेदार यासह ज्यांना तत्सम प्रकारचे काम यशस्वीपणे पुर्ण केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात. (अनुभवाचे प्रमाणपत्र लिफाफा क्र. १ मध्ये जोडण्यात यावे.
४. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहे.

दिनांक : १२/०३/२०२५
आर.ओ.सी.२०२४-२५ क्र.-५/सी ७१२७

सही/-
**(सं.ध. कट्टी )**
कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां.पेण- रायगड.

### घनकचरा संकलन व वाहतुकीचे नियोजन

# मार्टिन गॅरिक्सच्या इव्हेंटनंतर स्वच्छता

## नवी मुंबई महापालिकेकडून जलद कार्यवाही

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथील डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियममध्ये जगप्रसिध्द संगीतकार व डीजे मार्टिन गॅरिक्स यांच्या कार्यक्रमाचे आयोजन होळी सणानिमित्त करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी देशभरातून नागरिक नवी मुंबईत येण्याची शक्यता लक्षात घेऊन वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक पोलिसांनी परिसरातील रस्त्यांवरील वाहतूक बदल करीत नियोजन केले होते.

नवी मुंबई महापालिकेनेही कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने संगीत रसिक उपस्थित राहणार असल्याने आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा संकलन व वाहतुकीचे नियोजन केले होते.



जानेवारी महिन्यात याच स्टेडियममध्ये झालेल्या 'कोल्ड प्ले' या आंतरराष्ट्रीय लोकप्रिय संगीतमय कार्यक्रमाच्या वेळी घनकचऱ्याचे सुयोग्य नियोजन करण्यात आले होते. त्यामुळे अगदी पहाटेपर्यंत कचरा संकलन व वाहतुक करून शहर स्वच्छतेवर कोणताही परिणाम होऊ न दिल्याने महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाची प्रशंसा नागरिकांप्रमाणेच राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली होती.

याचधर्तीवर आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. अजय गडदे आणि सहा.आयुक्त सागर मोरे यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून स्वच्छता प्रक्रियेला गती दिली. परिमंडळ १ चे उपायुक्त सोमनाथ पोटरे व नेरूळ विभागाचे सहा. आयुक्त जयंत जावडेकर यांनीही याकामी योगदान दिले.

नेरूळ विभागाचे स्वच्छता अधिकारी अरुण पाटील व स्वच्छता निरीक्षक मिलिंद आंबेकर, नवनाथ ठोंबरे, भूषण सुतार यांच्यासमवेत घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सर्व पर्यवेक्षक, स्वच्छतादूत तसेच कचरा वाहतूक पर्यवेक्षक, व्यवस्थापक व सर्व स्वच्छता दूत यांनी सफाई कामाला गती देत रात्रीच पहाटेपर्यंत जलद स्वच्छता केली.

घनकचरा व्यवस्थापन विभाग अशा प्रकारच्या विविध कार्यक्रमांचे मोठे स्वरूप लक्षात घेऊन साफसफाईचे नियोजन करीत असल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## माजी नगरसेवकाच्या मुलावर चाकूहल्ला; पती-पत्नी गंभीर जखमी

**नवी मुंबई : बातमीदार**

भाजपचे माजी नगरसेवक केशव म्हात्रे यांचा मुलगा अभिजीत म्हात्रे यांच्यावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना कोपरखैरणे गावात शनिवारी रात्री घडली. यामध्ये अभिजित यांच्यावरील वार त्यांच्या पत्नीने स्वतःच्या हातावर घेतल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. या प्रकरणी एका हल्लेखोरावर कोपरखैरणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अभिजित म्हात्रे यांचाच नातेवाईक निलेश पाटील याच्यासोबत होळीच्या दिवशी वाद झाला होता. या रागातून निलेश याने नशेत शनिवारी हा प्रकार केला. सुरुवातीला नीलेशचा त्याच्या पत्नीसोबत वाद झाला होता. यामध्ये तो पत्नीला मारहाण करून घराबाहेर आला होता. त्याचवेळी अभिजित म्हात्रे समोर दिसल्याने निलेशने स्वतसोबत आणलेल्या चाकूने अभिजित म्हात्रेच्या




पोटात चाकू खुपसण्याचा प्रयत्न केला. शेजारीच असलेल्या अभिजित यांच्या पत्नी कांचन यांनी पतीवरील वार झेलण्यासाठी हातमध्ये घातला.

चाकू त्यांच्या हातातून आर पार निघून अभिजित यांच्या पोटात घुसला. घटनेनंतर निलेश पाटील याने पळ काढला असून, दोघाही जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तर हल्ला करणाऱ्या निलेश पाटील याच्यावर कोपरखैरणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि.१७) माहिती व तंत्रज्ञान विभागातर्फे करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले होते.

या करिअर मार्गदर्शनासाठी सुमित गुजर व समर्थ सकपाळ झेनटरम इन्स्टिट्यूट मुंबई यांनी महाविद्यालयात उपस्थित राहून माहिती व तंत्रज्ञान विभागातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या क्षेत्रात असणाऱ्या करिअर अपॉर्च्युनिटी तसेच प्लेसमेंट स्ट्रॅटेजी याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनात हा शैक्षणिक उपक्रम घेण्यात आला. या मार्गदर्शन सत्राचे आयोजन प्रा. राजश्री म्हात्रे यांनी केले तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागातील इतर सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## वाहनाच्या धडकेत तृतीयपंथीय ठार

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात वाहनाच्या धडकेत एका अज्ञात तृतीयपंथीयाचा मृत्यू झाल्याची घटना रोडपाली येथे घडली आहे. रोडपाली सिग्नल येथे पनवेल-मुंब्रा रोडवर कळंबोली येथे एका अज्ञात वाहनाने त्याच्या ताब्यातील वाहन हे भरधाव वेगाने, चालवून एका अज्ञात तृतीयपंथीयाला धडक मारली. त्यात तृतीयपंथीयाला गंभीर जखमा होऊन त्याचा मृत्यू झाला आहे. या अज्ञात वाहन चालकाविरोधात कळंबोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयत तृतीयपंथीयाचा रंग सावळा, अंगाने सडपातळ, केस काळे मध्यम, चेहरा उभट, नाक सरळ, उंची अंदाजे पाच फुट सात इंच असून नाकात कील, अंगात नेसून लाल साडी, हिरवा ब्लाऊज, पिवळा परकर घातलेला आहे. या तृतीयपंथीयाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कळंबोली पोलीस ठाणे किंवा उपनिरीक्षक एन.एस.शिरसकर (९५९४९३९७८०) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




**पनवेल : अमृत आणि कृती ताम्हणकर यांचा चिरंजीव विराज याचा व्रतबंध कार्यक्रम रविवारी झाला. या कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, भाजप युवा मोर्चा शहराध्यक्ष सुमित झुंझारराव यांची उपस्थिती लाभली.**

## वैधमापनशास्त्र यंत्रणा विभागातर्फे ग्राहक हक्क दिन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जागतिक ग्राहक हक्क दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व संरक्षण विभाग तसेच वैध मापन शास्त्र यंत्रणा विभाग नवी मुंबई यांच्या वतीने ग्राहक दिन साजरा करण्यात आला. या वेळी वाशी येथे नागरिकांना ग्राहक हक्कांविषयी तसेच वस्तूंवरील वजन इ. माहितीबाबत प्रबोधन माहिती देऊन जनजागृती करण्यात आली.



बाजारात विक्रीसाठी असणाऱ्या वस्तूंच्या आवरणावर एमआरपी, वजन, उत्पादनाची तारीख, पॅकेर्सवर पूर्ण पत्ता, ग्राहक, ई - मेल, दूरध्वनी क्रमांक इ. प्रिंट करणे कायद्याने बंधनकारक आहे. मात्र नागरिक ह्या सूचना तपासून घेत नसल्याने अनेकदा ग्राहकांची फसवणूक होते. शासनाच्या वैधमापन शास्त्र विभाग अशा व्यापाऱ्यांवर लक्ष ठेवते. ग्राहकांना त्यांच्या हक्कांची व विक्रेत्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव व्हावी, यासाठी दरवर्षी १५ मार्च हा दिवस जागतिक ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी ग्राहकहिताची जनजागृती करणारे कार्यक्रम राबविले जातात. या जनजागृतीचा एक भाग म्हणून वैधमापन शास्त्र विभागाच्या वतीने स्टॉल लावून वजनकाटे, मापे, आवेष्टित वस्तू उत्पादनांवरील आवश्यक माहिती इ. बद्दल प्रात्याक्षिके माहितीसह देण्यात आली. तसेच ग्राहक जनजागृती माहितीपत्रके वाटण्यात आली.

या वेळी वैध मापन शास्त्र यंत्रणा उपनियंत्रक, ठाणे जिल्हा क्रमांक २ सुहास कुटे यांचे मार्गदर्शनाखाली वाशी १ आणि ४ विभागाचे निरीक्षक एम. एच तडवी वाशी २ विभागाचे निरीक्षक हेमंत कुलथे, यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्षेत्र सहा. अनंत पाडवी, कर्मचारी रमाकांत गाडेकर यांनी परिश्रम घेतले.

या वेळी जागतिक ग्राहक हक्क दिन नागरीकांनी उपस्थित राहून सकारात्मक प्रतिसाद दिला. या वेळी अतिशय उपयुक्त माहिती मिळाली म्हणून यंत्रणेचे अधिकारी कर्मचारी यांचे उपस्थित ग्राहकांनी आभार मानले.

## चिरनेर हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



**उरण : प्रतिनिधी**

घरी कुटुंबाचे प्रेम आणि माया नातवंडांचा सहवास तरीही मैत्रीचे नाते काही वेगळेच असते. ५० वर्षांची अतूट मैत्री. कि या मैत्रीचे रक्ताचे नाते नसतांना देखील ही मैत्री आपुलकीचे व जिव्हाळ्याचे नातं निर्माण करते. हीच खरी मैत्री आणि त्याचे कारणही तसेच आहे.

उरण तालुक्यातील चिरनेर येथील को.ए.सो. सेकंडरी स्कूल चिरनेर या हायस्कूलच्या १९७५ च्या पहिल्या एसएससी बॅचच्या विद्यार्थी-विद्यार्थिनीचा स्नेह मेळावा अर्थात गेट-टुगेदर कार्यक्रम उरण तालुक्यातील चिरनेर येथील मानसी फार्म हाऊस येथे शाळेच्या जुन्या गोड आठवणींत नुकतीच संपन्न झाला.

चिरनेर शाळेतून दहावी पास होऊन गेलेले विद्यार्थी जवळजवळ ५० वर्षांनी एकत्र आले. आरंभी गणेश पूजन व सरस्वती पूजन करून कार्यक्रमाला प्रारंभ केला. त्यानंतर शाळेतील दिवंगत मित्र मैत्रिणींना श्रद्धांजली वाहण्यात आली. दरम्यान ग्राहक संरक्षण मंचाचे अध्यक्ष शशांक ठाकूर यांनी आपल्या मनोगतातून, त्यावेळचा वात्रटपणा, चेष्टा-मस्करी खुमासदार पद्धतीने व्यक्त केली. मंत्रालयाचे निवृत्त सहसंचालक नंदकुमार पाटील, निवृत्त माध्यमिक शिक्षिका मंदाकिनी पाटील, माजी नगरसेविका निर्मला पालकर निवृत्त शिक्षिका माई म्हात्रे, यांनी शाळा व गावाबद्दल प्रेम व्यक्त केले.

नंदकुमार चिरनेरकर, अनंत पाटील, के. बी. ठाकूर बबन कडू यांनी स्नेह मेळाव्याचे उद्दिष्ट समोर ठेवून शाळेत केलेली मौज, मजा, मस्ती, काढलेल्या एकमेकांच्या खोड्या अशा साऱ्या शाळेच्या जुन्या आठवणींना उजाळा देत, गमतीदार संवाद साधले.

पन्नास वर्षानंतर स्नेह मेळाव्याच्या निमित्ताने शालेय मित्र-मैत्रिणींना एकत्र आणण्याचे काम नंदकुमार चिरनेरकर, शशांक ठाकूर, अशोक कांबळे, बबन कडू, श्याम ठाकूर, के.बी. ठाकूर, बळीराम पाटील, दत्तात्रेय पाटील यांनी केले.



**पनवेल : इंडिया बुल्स येथे डॉ. चिराग जायस्वाल, डॉ. किरण जायस्वाल आणि डॉ. सेजल जायस्वाल यांच्या द डेंटल ३६० या क्लिनिकचे उद्घाटन महापालिकेचे माजी आरोग्य सभापती डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी नरेश पाटील, रमेश वावले आदी उपस्थित होते.**

## सीपी प्रजापती यांना पुरस्कार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सामाजिक कार्यकर्ते सीपी प्रजापती यांना संस्थापक अध्यक्ष अभिजित राणे धडक कामगार युनियन महासंघाच्या वतीने महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले. प्रजापती यांनी आयोजक व पुरस्कार निवड समितीचे मनापासून आभार व आभार मानले आहेत.




या वेळी प्रजापती समाज विकास मंडळ रजि. रायगड जिल्हा सचिव इंदर प्रजापती यांच्यासह संघटनेच्या अनेक सदस्यांसह सामाजिक कार्यकर्ते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आवक वाढल्याने हापूसचे दर घसरले



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशीतील एपीएमसी बाजारात हापूसची आवक वाढली असून बाजारभाव उतरले आहेत. वातावरणात उष्मा वाढल्याने आंब्याची तोडणी लवकर केल्याने मंगळवारी बाजारात हापूसच्या सहा हजार पेट्या दाखल झाल्या आहेत, परंतु हापूसची लवकर तोडणी केल्याने बहुतांशी आंबे लहान आकाराचे आहेत. हापूसच्या दरात प्रतिपेटी पाचशे ते हजार रुपयांनी घसरण झाली आहे.

आधी ४ ते ६ डझनांच्या पेटीला साडेतीन ते ७ हजार रुपये दराने विक्री होती, ती आता तीन हजार सहा हजार रुपयांनी होत आहे. यंदा चांगले उत्पादन मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत होती, परंतु दरम्यानच्या कालावधीत हवामान बदलाने उत्पादनाला फटका बसत आहे. काही दिवसांपासून वातावरणात प्रचंड उष्मा वाढत आहे. हापूसला जादा उन्हाचा तडाखा बसत असून कोकणातील बागायतदार आता आंबा तोडणीवर भर देत आहेत. हापूसला कडक ऊन लागत असून त्याचा दर्जावर परिणाम होत आहे. तसेच आंबे गळून पडत आहेत. त्यामुळे आंबा उत्पादक तोडणी करण्यावर भर देत आहेत.

> *मार्चपासून कोकणातील हापूस तसेच कर्नाटक, रायगड आंब्यांची आवक वाढली आहे, मात्र कडक उन्हाचा फटका हापूसला बसत असून हापूस बागायतदार यांनी परिपक्व होण्याआधीच तोडणीला सुरुवात केली आहे. बाजारात ८० टक्के लहान तर २० टक्के मोठ्या आकाराचा आंबा दाखल होत आहे.*
> **-संजय पिंपळे, व्यापारी**

## नरेंद्राचार्य महाराजांचा पादुका दर्शन सोहळा, भव्य शोभायात्रा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज दक्षिणपिठ - नाणीजधाम महाराष्ट्र यांचा पादुका दर्शन सोहळा रविवारी (दि.२३) गौळवाडी मैदान येथे आयोजित करण्यात आला आहे.

या शुभदिनी नरेंद्राचार्य महाराज यांच्या सिद्ध पादुकांसमवेत गुरुपुजनाचा, उपासक दिक्षेचा, प्रवचनाचा व जगद्गुरु श्रींच्या सिद्ध पादुकांच्या दर्शनाचा लाभ उपस्थित भाविक भक्तांना व हितचिंतकांना मिळणार आहे तसेच या दिवशी कार्यक्रम ठिकाणी हजारो हितचिंतक भक्त / उपासक दीक्षा घेणार आहेत.

श्रींच्या या पादुका दर्शन सोहळयाच्या निमित्ताने प्रवचनाच्या माध्यमातून अध्यात्म, विज्ञान आणि व्यवहार यांची सांगड घालून सुखी जीवन कसे जगता येईल, मानवी मनाचा विकास कसा साध्य होईल तसेच भारतीय संस्कृतीचे जतन यावर ज.न म. प्रवचनकार यांच्या माध्यमातून उद्बोधक मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या भव्य दिव्य अशा पादुका दर्शन सोहळ्याची सुरुवात श्रींच्या पादुकांसमवेत भव्य दिव्य अशा शोभायात्रेच्या माध्यमातून विविध नयनरम्य कला पथकांच्या उपस्थितीत कार्यक्रमस्थळी होणार आहे तसेच श्रींच्या या पादुका दर्शन सोहळ्याच्या निमित्ताने नरेंद्राचार्य महाराज संस्थानाच्या सामाजिक उपक्रमांतर्गत गरीब आणि गरजूंना मोफत ब्लँकेट किटचे कार्यक्रमस्थळी वाटप करण्यात येणार आहे.

या गुरुपुजनचा, प्रवचनाचा दर्शनाचा व पुष्पवृष्ठीचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्व-स्वरूप संप्रदाय, जिल्हा सेवा समिती उत्तर रायगड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## ऐतिहासिक चिरनेर गावात शिवरायांचा जयजयकार

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील ग्रामस्थ मंडळ चिरनेर रांजणपाडा, चिंचपाडा यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवजयंतीच्या निमित्ताने सोमवारी (दि.१७) मार्च रोजी रांजणपाडा व चिंचपाडा येथील शिवाजी चौकात जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

या वेळी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून, अभिवादन करून भगवा फडकविण्यात आला. तसेच हर हर महादेव, जय भवानी, जय शिवराय अशा जयघोषासह ढोल ताशांचा गजर, भगवे झेंडे कमानी आणि हृदयी पाटील या पाच वर्षाच्या शिवकन्येने शिव घोषणेतून शिवरायांचे सुरेख व समर्पक वर्णन केले. यामुळे इतिहास पुन्हा एकदा जिवंत झाला.



या वेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा अभिषेक सोहळा तसेच ह भ प प्रकाश महाराज पाटील यांचे शिवबांच्या जन्मोत्सवाचे किर्तन व पाळणा गीत सादर करण्यात आले. शिव जन्मोत्सवानिमित्ताने श्री सत्यनारायणाची महापूजा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी चार वाजता छत्रपती शिवाजी महाराजांची चिरनेर गावातून भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली होती.

# खोपोलीत नियमित पाणीपुरवठ्याची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

वाढीव पाणीपुरवठा योजनेतील सर्व टप्पे एक वर्षांपूर्वी पूर्ण झाली आहेत. त्यातून पूर्वीच्या ६५-७० दशलक्ष लिटर पाणी क्षमतेवरून खोपोली पाणीपुरवठा क्षमता आत्ता ११० ते १२० दशलक्ष लीटर पाणी उचलण्याची, साठवणुकीची व वितरण क्षमतेची झाली आहे.नगरपालिकाकडून संपूर्ण खोपोली पाणीदार बनण्याकडे वाटचाल करीत असल्याचे सांगितले जात आहे. आजही अनेक भागांत अनियमित पाणी पुरवठा होत आहे.



या योजनेचा उपोयोग अद्यापही शिळफाटा भागातील पटेलनगर, मिलठाकूरवाडी, ताकईगांव, बौध्वावाडा, लौजी गावाचा मोठा हिस्सा, यशवंत नगर व अनेक उंचावर असलेल्या रहिवाशी भागांना होत नसल्याने येथील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे खोपोलीत एका बाजूला पाणीदार तर अनेक भागांत मात्र पाणीटंचाई परस्पर विरोधी स्थिती निर्माण होत आहे.

उन्हाळी तीन महिन्यांत खोपोलीतील कुंपनलिका कोरड्या पडत असल्याने व नगरपालिका कडून गरजे एवढा पाणी पुरवठा केला जात नव्हता म्हणून शहरात तीव्र पाणीटंचाई निर्माण होत होती. या समस्येवर उपाय म्हणून २००९ मध्ये तत्कालीन नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर यांच्या पाठपुराव्यातुंन केंद्र सरकारच्या शहरी विकास मंत्रालय अंतर्गत जवाहरलाल नेहरू पाणी पुरवठा योजनेतून खोपोलीसाठी वाढीव पाणी पुरवठा योजना मंजूर झाली. कामांत झालेली दिरंगाई व ठेकेदारांची मनमानीमुळे मूळ १५ कोटीची ही योजना अस्तित्वात येईपर्यंत ३८ कोटींपेक्षा अधिक निधीची बनली. अनेक अडचणींचा सामाना करीत सद्य स्थितीत या योजनेचे सर्व टप्पे पूर्ण होऊन आत्ता शहर पाणीपुरवठा योजना १२० दश लक्ष लिटर क्षमतेची झाली आहे.

या योजने अंतर्गत नवीन व अधिक व्यासाच्या जलवाहिन्या टाकणे, पंप्पिंगसाठी वाढीव क्षमतेचे पंप बसविणे, पाणी वितरण प्रणाली दुरुस्त करणे, उंच भागासाठी त्याच भागात साठवणूक टाक्या उभारणे अशी कामेही पूर्णत्वास आली आहेत. याचा लाभ या वर्षी खोपोलीतील अनेक रहिवाशी भागांना होऊन या ठिकाणी नागरिकांना उन्हाळी दिवसांतही गरजेएवढे पाणी उपलब्ध करण्यास नगरपालिकेला यश आले आहे.

शिळफाटा येथील पटेलनगर, मिलठाकूरवाडी, ताककईगांव, यशवंतनगर, सुभाष नगर, हाळसह शहरातील अनेक उंचावरील भागांना अनियमित पाणी वितरणामुळे वाढीव पाणीपुरवठा योजनेचा उपयोग अद्यापही होत नसल्याने या भागात नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. दूसरीकडे अनेक भागांत गरजे पेक्षा अधिक पाणी पुरवठा सुरू असल्याने येथे हजारो लीटर पाणी वाया जात असल्याचे चित्र आहे. त्यामुळे खोपोलीत एका बाजूला मुबलक पाणी तर काही भागांत मात्र पाणी दुष्काळ अशी स्थिती बनल्याने टंचाई ग्रस्त भागातील नागरिकांचा संतापाचा सामना नगरपालिका प्रशासनास करावा लागत आहे.

**पाणी शुध्दीकरण व वितरण प्रणालीत सुधारणा होण्याची गरज आहे. पाणी साठवणूक क्षमता मजबूत आहे. सर्व रहिवासी भागांत समान पाणीपुरवठा वितरित होण्याची प्रणाली मजबूत होण्याची आवश्यकता आहे.**
**-कुलदीपक शेंडे, माजी उपनगराध्यक्ष व पाणी पुरवठा सभापती, खोपोली**

**ज्या भागांत पाणीपुरवठा कमी दाबाने होतो त्या भागातील पाणी वितरण प्रणालीत तातडीने सुधारणा होण्यासाठी पाणीपुरवठा विभागाला सूचना दिल्या आहेत. पंपिग, शुध्दीकरण ते वितरण अशा सर्व टप्प्यात पाणी गळती कमी होण्यासाठी ही प्रयत्न सुरू आहेत.**
**-डॉ. पंकज पाटील, मुख्याधिकारी तथा प्रशासक खोपोली नगरपालिका**

# मुरूडमधील वैकुंठधाम स्मशानभूमी प्रदूषणमुक्त

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगरपरिषदेच्या वतीने अनेक वर्षांपूर्वी बांधण्यात आलेली वैकुंठ धाम स्मशानभूमीचा कायापालट झाला आसुन ही स्मशानभूमी प्रदुषण मुक्त स्मशानभूमी म्हणून घोषित झाली आहे.

गेली दहा वर्षे पुर्वी चित्र मुरूडच्या स्मशानभूमी दिसत होतं लाकडाची वखार मोडकळीस, पाण्याची गैरसोय, बसण्याची सोय, अग्नीधनच्या ठिकाणी तुटलेले पत्रे तर भिंतीना तडे, पाऊसात तर अंत्यविधीसाठी येणाऱ्या समस्त नागरिकांना आजुन बिकट परिस्थितीला तोंड द्यावे लागत होते. समस्त नागरिकांनी या संदर्भात नाराजी दर्शवली होती. आमदार महेंद्र दळवी निवडुन आल्यावर यांची दखल घेऊन लाखो रुपयांची निधी वैकुंठ धाम स्मशानभूमी सुशोभीकरण्याकरिता दिली. त्वरीत नगर परिषदेच्या मार्फत ठेकेदाराकडुन दशक्रिया हॉल, हात-पाय धुण्यासाठी पाण्याची सोय, अंत्यविधीसाठी आलेल्यांना बसण्यासाठी स्टेडियमच्या स्वरूपाची आसन व्यवस्था करण्यात आली.



नव्याने बांधण्यात आलेल्या संरक्षक भिंतीवर रंगरंगोटी करण्यात आली आहे. तसेच परिसरातील मोकळी जागेत वृक्ष लावण्यात आल्याने स्मशानभूमी हिरवीगार दिसु लागली. यामुळे वैकुंठ धाम स्मशानभूमी सुसज्ज व नीटनेटकी दिसु लागली. प्रदुषण मुक्त स्मशानभूमी साठी नवीन गॅस शवदाहिनी बसुन नागरिकांना मोफत व्यवस्था करण्यात आली. आतापर्यंत एक ही मयत व्यक्तीकरिता लाकडाचा वापर होत नसल्याने वैकुंठ धाम स्मशानभूमी ही प्रदुषण मुक्त स्मशानभूमी होऊ लागली आहे.

कोरोनापासुन नागरिकांनी अंत्ययात्रेला खांदे लावण्याची परंपरा बंद केल्याने स्मशानभूमी पर्यत मयत नेण्यासाठी टेम्पो, खासगी रुग्णवाहिका वापर होऊ लागला, परंतु गरीब मयत घराच्या लोकांना यांचा आर्थिक फटका बसु लागला. यांची ही दखल ही मुरूड जंजिरा नगर परिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी घेऊन नफा फंडातुन शववाहिनी आणुन नागरिकांना दिलासा दिला. यामुळे या वैकुंठ धाम स्मशानभूमीचा कायापालट झालेला दिसुन येत आहे.

# स्वयंसहाय्यता गटांतील महिलांचा सन्मान

**चौक : प्रतिनिधी**

टाटा स्टील कर्मचारी व टाटा स्टील फाऊंडेशन यांच्या वतीने सावरोली, देवन्हावे आणि दहिवलीतील स्वयंसहाय्यता गटांच्या महिलांचा सन्मान करण्यात आला.



जागतिक स्तरावर महिलांच्या हक्कांचा सन्मान करण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी टाटा स्टील फाउंडेशन व टाटा स्टील खोपोली यांनी सावरोली, देवन्हावे आणि दहिवली येथील स्वयंसहाय्यता गटांचा विशेष कार्यक्रम करून सन्मान केला.

कार्यक्रमात महिलांच्या सबलीकरणावर भर देण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाबाबत मार्गदर्शन केले. टाटा स्टीलच्या कर्मचाऱ्यांनी सर्व महिलान सोबत त्यांच्या व्यवसायाबद्दल चर्चा केली व त्यांना बिजनेस कसा वाढवता येईल ह्या बद्दल उपदेश दिले.

या कार्यक्रमामुळे महिलांच्या आत्मविश्वासात वाढ झाली असून, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी त्यांना नवी दिशा मिळाली, असे कार्यक्रमाच्या माध्यमातून दिसून आले.

# किल्ले रायगड ते खारअंबोली शिवज्योत यात्रा

## शिवप्रेमींचा उत्स्फूर्त सहभाग

**मुरूड : प्रतिनिधी**

शिवजयंती सोहळ्यानिमित्त श्री शिवप्रेमी मित्र मंडळ खारअंबोली आयोजित शिवज्योत (मशाल) पायी यात्रा रायगड किल्ला ते मुरूड खारआंबोलीपर्यंत भव्य दिमाखात सोहळा झाला.

या वेळी श्री शिवप्रेमी मित्र मंडळ खारअंबोली अध्यक्ष चिंतामणी बेडेकर, संकेत म्हात्रे, संदेश म्हात्रे, गणेश कमाने, दामोदर वारगे, गणेश गोसावी, अक्षय बेडेकर, दिपेश पेरवे, मंगेश खंडागळे आदींसह शेकडो श्री शिवप्रेमी मित्र मंडळाचे शिवप्रेमी उपस्थित होते.

पायी यात्रा मुरूड शहरात आगमन होताच जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव, धर्मवीर संभाजी महाराज की जय असा जयघोष करण्यात आला आणि परिसर दुमदुमला. पद्मदुर्ग ढोलताशांच्या वाद्यात स्वागत करण्यात आले. या वेळी मुरुड शहरातील कुणाल सतविडकर,



रूपेश जामकर आदींसह शेकडो शिवप्रेमी उपस्थित होते.

# अंगणवाडीच्या मुलांना खाऊवाटप




**माणगाव : बातमीदार**

महाराष्ट्र राज्याच्या महिला व बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या या वाढदिवसाच्या निमित इंदापूर विभाग राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तर्फे इंदापूर विभागातील एकूण ३८ अंगणवाडीतील लहान लहान मुलांना खाऊची पाकिटे तसेच चॉकलेट वाटप कार्यकर्ते तसेच पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यातआले.

या वेळी भुवन, रातवड, वावेदिवाळी, निळज, पोटणेर, तळाशेत या ग्रामपंचायतीमध्ये मुलांना खाऊची पाकीटे वाटप करताना इंदापूर विभागातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी माणगांव तालुका अध्यक्ष बाळा काका नवगणे, राष्ट्रवादी रायगड जिल्हा उपाध्यक्ष शेखरशेठ देशमुख, महाराष्ट्र युवा सचिव दिपक जाधव, राष्ट्रवादी जिल्हा सचिव उदय अधिकारी, महेश महाजन, नितिन घोणे, शुक्रदास मोरे, नथुराम पवार, राम येलकर तसेच सर्व अंगणवाडी सेविका, मदतनिस उपस्थित होत्या.

# रेवदंड्यातील पोर्तुगीजकालीन आगरकोट किल्ला

चौल चंपावती या प्राचीन संपन्न नगरीचे पोर्तुगीज अमलामध्ये दोन भाग पडून रेवदंडा विभागाला लोअर चौल व चौल विभागाला अप्पर चौल संबोधले जाऊन रेवदंडा व चौल ही दोन ग्राम गावे निर्माण झाली. सन इ.स. १५२४ मध्ये पोर्तुगिजांनी रेवदंड्याचा आगरकोट किल्ला बांधून पुर्ण केला. व सुमारे २०० वर्षापेक्षा जास्त काळ म्हणजेच मराठयानी इ.स.१७४० मध्ये हा प्रदेश ताब्यात घेईपर्यंत तो पोर्तुगिजाच्या ताब्यात होता. या कालावधीत या किल्लात बांधलेल्या अनेक इमारती , बुरूज, तटबंदी चर्च, दरवाजे, तुरूंग, पागा, इत्यादींचे अनेक भग्नावशेष आजही पहावयास मिळतात.



रेवदंडा गावाचे दक्षिण टोकास या किल्लाचा दक्षिण दरवाजा आहे. तेथपासून अलिबाग रस्त्यावर किल्लाचा तट फोडून तयार केलेल्या मार्गापर्यंत हा किल्ला विस्तारलेला आहे. रेवदंडा अलिबाग रस्त्याच्या थोडे पुढे पश्चिमेला किल्ल्याचा उत्तर दरवाजा आहे. या दोन दरवाज्यामध्ये असणाऱ्या किल्ल्याचे अनेक अवशेष आजही पहावयास मिळतात.

१६व्या शतकात इ.स.१५२४ मध्ये किल्ला बांधल्यानंतर सोळाव्या शतकाच्या अखेर पुर्व काळात येथे अनेक इमारती बांधल्या गेल्या. सन इ.स. १६३४ मध्ये बोकारो याने या ठिकाणचे खुलासेवार वर्णन केले आहे. त्यावेळी पोर्तुगिज किल्लात घडीव दगडांच्या भिंती असलेल्या आवाराच्या आत सेनाधिकारी रहात होता. तेथे एक तुरूंगही होता, किल्लात २०० पोर्तुगिज व ५० स्थानिक ख्रिश्चनांची मजला असलेली घरे होती तसेच दोन शस्त्रागरे होती. त्याचप्रमाणे किल्लात भव्य कॅथेड्रक रूग्णालय,सेंट पॉल जेझुईट चर्च, जेझुइट मोनॅसटी, डोमिनिकन फ्रॉन्सिस्कन चर्च, सातखणी बुरूज,यामध्ये सातखणी बुरूज डोमिनिकन फ्रॉन्सिस्कन चर्चचा भाग समजला जातो व ऑगास्टिनियन चर्च व मॉनेस्टटी अशा सात इमारती होत्या. पोर्तुगिज काळात या भागाचे वैभव खुप मोठे आवे, काळाच्या औघात या वास्तू नष्ट झाल्या. त्याप्रमाणे भिंतीच्या बाहेर सेंट सॅबेस्टीयन चर्च, सेंट जॉन पॅरिस चर्च, व मदर ऑफ गॉड चे कॅपूचिन चर्च अशा तीन इमारती होत्या. त्यापैकी मदर ऑफ गॉडचे मंदिर, रेवदंडा गोळा स्टॉपवरून भोईवाडा येथे जाणार्या रस्त्यावर अस्तित्वात आहे. त्याला मांजरूबाईचे मंदिर असेही म्हटले जाते. मांजरदेस असंही उल्लेख इतिहासात आढळतो.

बोकारोने आणखी काही वास्तू व बुरूजांची नोंद करून ठेवली आहे, त्यात नऊ बुरूजाचा उल्लेख करतो. नदीच्या बाजूकडे पहिल्या बुरूजावर १८ पौड वजनाची दगडी गोळे मारू शकणारी कॅमेस नावाची एक मोठी तोफ होती. दुसर्या व तिसर्या क्रमांकाच्या बुरूजावर फक्त वाळू भरून ठेवली होती. चौथ्या बुरूजावर १८ पौढी दमडी गोळा फेकणारी आणखी एक कॅमेल तोफ व ६५ पौढी लोखंडी गोळा गोळा फेकणारी एक तोफ व प्रत्येक अशा दोन तोफा व लहानसे किल्लासारखे बांधकामे होती. व आतून लोखंडी आवरण असलेली पितळी सर्पाकृती तोफ होती. तिच्यातून १६ पौडी गोळे उडवीत.

सॅम डिनिस या सहाव्या बुरूजावरून लोखंडी तोफेतून १४ पौडी दगडी गोळे उडवित. येथे समुद्राकडे तोंड करून लहानश्या किल्लासारखे बांधकाम होते. सातव्या बुरूजावर ४० पौड वजनाचे गोळे फेकणारी गरूउ तोफ व प्रत्येक ५० पौड वजनाचे गोळे फेकणार्या दोन तोफा होत्या. आठव्या बुरूजावर तोफा नव्हत्या. शेवटच्या नवव्या बुरूजावर २४ पौड वजनाची लोखंडी गोळे फेकणारी एक तोफ होती. सन १६२५ मध्ये आग्नेय कोपार बांधला तेव्हा कॅथेड्रल भिंतीच्या बाहेर होते, मात्र १६३४ मध्ये ते भिंतीच्या आत आले. सन १६३४ नंतर तटबंदीची बरीच दुरूस्ती केली. सन १६३५ मध्ये उत्तर दरवाजा तर १६३८ मध्ये दक्षिण दरवाजा दुरूस्त झाला. सन १६५६ मध्ये दक्षिण दरवाजासमोरचे बांधकाम केले. व १६८८ मध्ये वायव्येचा टॉवर बांधला. सरासरी ६.०९ मीटर उंच व ३.६६ मीटर रूंद असलेल्या गोलाकार भिंतीच्या लांबी अंदाजे २.४२ कि.मी. होती. या भिंतीवर बंदुकीने मारा करण्यासाठी लहान झरोके असलेली १.८३ मीटर उंचीची दुसरी भिंत होती तसेच अर्धवर्तुळाकार नऊ मनोरे होते. किल्लाचे आवार दक्षिणोत्तर व पूर्व पश्चिम अनुक्रमे २०१, १६८ मी. व ३०१.७१२ मी.होते. पश्चिम व दक्षिणेकडून हल्ला होण्याची भिती नव्हती. तसेच पुर्वेकडील दलदलीच्या प्रदेशामुळे तिकडूनही कमी भिती होती. म्हणून या तिन्ही बाजूंनी फार भव्य मजबुतीची आवश्यकता नव्हती, भिती हाती ती उत्तरेकडून म्हणूनत्या बाजूस २.१३ मी खोल व १७ पावले रूंद असा खंदक समुद्रापासून चौल खाडीच्या वायव्य टोकापर्यंत खणला होता. ५ डिसेंबर १७२८ रोजी आंद्रे रिबेरो कुटिन्होने पोर्तुगिज चौलची म्हणजे रेवदंडयाची कार्यालयीन तपासणी केल्यावर लिहिलेल्या अहवालानूसार किल्ला आकाराने पंधरा बाजू असलेला व अकरा बुरूजाचा होता. तीस ते चाळीस पौडी ५८ तोफा दगडाचा मारा करण्याचा तोफा, ६२ व्यक्तीची एक याप्रमाणे तीन कंपन्या होत्या. याशिवाय स्थानिक मच्छीमार बोटीवाले व नारळाच्या झाडावर चढणारे होते. शहराच्या भिंतीच्या बाहेर उत्तरेकउील श्रीमंत लोकवस्ती असलेल्या बाजूस संरक्षणासाठी सुरक्षीत जागा बांधून तेथे १९ तोफा, सैन्याच्या दोन कंपन्या आणि २३४ भंडारी होते. सभोवतालचा खंडक काही ठिकाणी वाळूने भरला होता. कुटिन्हो याने असेही नमूद केले आहे की, १६३४ पासून तटबंदीची इतकी दुरूस्ती झाली की, ती जणू नव्यानेच बांधल्यासारखी आहे. पश्चिमेच्या बाजूने समुद्राच्या लाटामुळे झालेले नुकसान सोडता बाकी सर्व बांधकाम सुस्थितीत आहे.

सध्या त्याची एक दगडी भव्य कमान, पाठभिंत व बाजूच्या भिंती आहेत. खिडक्यांच्या वर पुढे आलेल्या भागावर नक्षीकाम आहे. दक्षिणेकडील बाजूस काही अक्षरे कोरलेली आहेत. मुख्यः मोइया कमानीच्या दोन्ही बाजूस उंच खिडक्या असलेल्या भिंतीचे अवशेष आहेत. समोर डाव्या बाजूस धोडयांच्या पागेची जागा आहे. समोर भव्य इमारतीचे अवशेष विखुरलेले आहेत. हे चर्च १६३४ मध्ये सर्वात वैभव संपन्न होते. डोमिनिकन चर्च व मठीच्या पुर्वेस सुमारे ४५.७२ मीटरवर लहान इमारतीचे काही अवशेष दिसतात. तेथून पुढे काही अंतर गेल्यावर उजव्या बाजूस सेंट झेविंयर चॅपलचे आकर्षण दिसतात. त्याच्या दरवाजावरील एक चौकोनी दगड खाली पडला असून त्यावर लेख आहे. या चर्चच्या दोन्ही बाजूच्या भिंती शिल्लक आहेत. डोमिनिकन चर्च व सेंट झेविंयर चॅपेलवरील संगमवरी शिलालेखावरून त्याचे स्थान निश्चित करता येते.

सन १७३९ मध्ये वसई मराठ्याच्या ताब्यात गेल्यावर यापुढे आपला टिकाव लागणार नाही हे जाणून पोर्तुगिजानी आगरकोट व कोर्लई हे दोन्ही किल्ले इंग्रजाना दिले. पुढे अॅग्लो-पोर्तुगिजांच्या प्रतिनिधी कॅप्टन इंचबर्ड यांच्या मध्यस्तीने १७४० मध्ये तह होऊन चौलचा प्रदेश मराठ्यांना मिळाला व पोर्तुगिज गोव्याला गेले.

**-महेंद्र खैरे, रेवदंडा**

### इतिहासात नोंद

पोर्तुगिज रेवदंड्याच्या इतिहास पहाता येथे त्यानी सन इ.स.१५८० पासून चर्च, शाळा आणि चेझुइट कॉलेजही उभे केले होते. पोर्तुगिजांनी रोमच्या धर्तीवर रेवदंड्यास चर्चचे काम सुरू केले होते. सेंट झेव्हियअरने कॉलेज सुरू करण्यात तर डॉ. चेअरी स्टोव्हन यांने फंड जमा करून मर्सी हाऊस सुरू केले होते. येथे सुरू केलेल्या कॉलेज मध्ये तर्कशास्त्र, खगोलशास्त्र, धर्मतत्वे, शिकविली जात अशी नोंद इतिहासात सापडते.



**मुरूड : तिथीप्रमाणे शिवजयंतीनिमित्त श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय नांदगाव हायस्कूल येथे मुख्याध्यापिका अर्चना खोत व पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर यांच्या हस्ते महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार घालण्यात आला.**


**पनवेल महानगरपालिका, ४१० २०६**
**जाहीर नोटीस**

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे-रोहिंजण, ता. पनवेल या महसूली गावातील राष्ट्रीय महामार्गालगतचा सर्व्हे नं. ४६ पासून ते मौजे-चाळ या महसूली गावातील सर्व्हे नं. ३ पर्यंतच्या ३०.०० मी. रूंदीच्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २०५, २०६, २०७ व २०९ नुसार तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या विकास योजना रस्त्याने क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजाखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी.आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णन :- मौजे तळोजे मजकूर, ता. पनवेल येथील श्री. अभिरत अंकुश शिंदे व श्री. जिया अब्दुल सत्तार नमरे यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील प्रस्तावित ३०.०० मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र पुढीलप्रमाणे :- १) मौजे- तळोजे मजकूर, सव्र्हे नं. ६८/१ रस्त्यासाठी बाधीत क्षेत्र - ११८०.८३ चौ. मी.

त्यास मोजणी नकाशानुसार चतुःसीमा खालीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | लागून हिस्सा नं. ०२ |
| पश्चिमेस | : | सर्व्हे नं. २२ |
| उत्तरेस | : | सर्व्हे नं. २४ व ५३ |
| दक्षिणेस | : | लागून हिस्सा नं. ०४ |

टिप :- उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.

दिनांक : १७/०३/२०२५

जा.क्र.- पमपा/नरवि/टिडीआर/२६-२५/७४०/२०२५

**सही/-**
सहाय्यक संचालक नगररचना
पनवेल महानगरपालिका,

टिप - सदरची जाहीर नोटीस पनवल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

# इंडिया मास्टर्स संघ चॅम्पियन

## आयएमएलमध्ये सचिनसेनेची लाराच्या टीमवर मात




**रायपूर : वृत्तसंस्था**

क्रिकेटचा देव आणि मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरच्या नेतृत्वाखालील इंडिया मास्टर्स संघाने इंटरनॅशनल मास्टर्स लीग टी-२० स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. अंतिम लढतीत भारतीय संघाने लाराच्या नेतृत्वाखालील वेस्ट इंडिज संघाला सहा विकेट्सने पराभूत करत यंदाचा हंगाम गाजवला. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेनंतर दिग्गजांनी बहरलेल्या सचिन तेंडुलकरच्या नेतृत्वाखालील भारतीय क्रिकेट संघानेही 'चॅम्पियन'चा रुबाब दाखवून दिला.

सचिन तेंडुलकर विरुद्ध ब्रायन लारा या दोन दिग्गजांच्या संघात रविवारी रंगलेला फायनल सामना पाहण्यासाठी रायपूरच्या मैदानात तुफान गर्दी जमली होती. ५२ वर्षी सचिनची क्रेझ पुन्हा एकदा अनुभवायला मिळाली. सचिनला या सामन्यात मोठी खेळी करता आली नाही, पण १८ चेंडूतील २५ धावांच्या खेळीत त्याच्या भात्यातून निघालेले दोन खणखणीत चौकार आणि एक षटकार चाहत्यांच्या डोळ्याचे पारणे फेडणारे आणि त्याचे जुने तेवर दाखवणारे असेच होते.

फायनल लढतीत पहिल्यांदा फलंदाजी करताना वेस्ट ड्वेन स्मिथ आणि ब्रायन लारा या जोडीने वेस्ट इंडिज मास्टर्स संघाच्या डावाची सुरुवात केली, मात्र लाराला काही आपल्या भात्यातील तो जुना तोरा दाखवता आला नाही. अवघ्या सहा धावा करून त्याने तंबूचा रस्ता धरला. स्मिथने केलेली ४५ धावांची खेळी आणि लेन्डल सिमन्स याने ४१ चेंडूत केलेल्या ५७ धावांच्या खेळीच्या जोरावर कॅरेबियन संघाने निर्धारित २० षटकात १४८ धावा केल्या.

भारतीय संघाच्या गोलंदाजीत विनय कुमारसह शाहबाज नदीम चमकला. विनय कुमारने भारताकडून सर्वाधिक तीन विकेट्स आपल्या नावे करत कॅरिबयन फलंदाजीला सुरुंग लावला. दुसरीकडे शाहबाजने चार षटकात १२ धावा खर्च करत दोन विकेट्स आपल्या खात्यात जमा केल्या. या दोघांशिवाय नेगी आणि बिन्नी यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

धावांचा पाठलाग करताना भारताच्या अंबाती रायडूने जलवा दाखवला. भारताच्या डावाची सुरुवात करताना त्याच्या भात्यातून ५० चेंडूत ७४ धावांची खेळी पहायला मिळाली. त्याने आपल्या या दमदार खेळीत नऊ चौकारांसह तीन उत्तुंग षटकारही मारले. युवराज सिंग नाबाद १३ धावा आणि स्टुअर्ट बिन्नीने नाबाद १५ धावा करत इंडिया मास्टर्स संघाला सहा विकेट्स आणि १७ चेंडू राखून संघाला विजय मिळवून दिला.

## मातोश्री इलेव्हन संघ नागोठणे प्रीमिअर लीगचा विजेता



**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे क्रिकेट असोसिएशनच्या वतीने वेलशेत येथील भव्य मैदानात नागोठणे प्रीमिअर लीग २०२५ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मातोश्री इलेव्हन संघाने विजेतेपद पटकाविले.

बक्षीस वितरण समारंभास पिगोंडे सरपंच तथा राष्ट्रवादी विभागीय अध्यक्ष संतोष कोळी, भाजप नेते किशोर म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर, सामाजिक कार्यकर्ते जुगन जैन, अनिल डाकी, पळस उपसरपंच चंद्रकांत भालेकर, राहुल मेस्त्री, कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष गणपत म्हात्रे, वेलशेत गाव कमिटी खजिनदार विजय पारंगे, रमेश पारंगे, भावार्थ जांबेकर, जय म्हात्रे, मंदार निंबाळकर, रोनिक झेमसे, सुरेश जोशी, नागोठणे क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष राजेश पिंपळे, उपाध्यक्ष सुधीर भोय, खजिनदार सुनील बडे, सचिव गिरीश मढवी व सदस्यांसह क्रिकेटप्रेमी व खेळाडू उपस्थित होते.

द्वितीय क्रमांक जय/भावार्थ इंटरप्राइजेस संघाने, तृतीय विधी इंटरप्रायजेस मुरावाडी संघ व चतुर्थ क्रमांक एस.के. इलेव्हन वेलशेत संघाने मिळविला. विजेत्या संघांना चषक व रोख रक्कम देण्यात आली. त्याचबरोबर मालिकावीर यश पारंगे (मातोश्री इलेव्हन), उत्कृष्ट फलंदाज आशिष ताडकर (विधी इंटरप्रायजेस), उत्कृष्ट गोलंदाज राजेश पिंपळे (मातोश्री इलेव्हन) व उत्कृष्ट क्षेत्ररक्षक निरज बावकर (मातोश्री इलेव्हन) यांना आकर्षक सायकल देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेत समालोचक म्हणून प्रमोद चोगले, आदेश पोकळे व राहुल ताडकर, पंच म्हणून मुरूडचे महमद बकवाल व अलिबाचे शैलेश महाडिक यांनी, तर गुणलेखक म्हणून मंदार पाटील यांनी काम पहिले. या संपूर्ण स्पर्धेचा युट्यूबच्या माध्यमातूनही असंख्य क्रिकेटप्रेमींनी आनंद घेतला.

## शफाली वर्माची वनडे ट्रॉफीत हॅट्ट्रिक



**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

महिला प्रीमियर लीगच्या तिसऱ्या हंगामातील फायनल खेळल्यावर अवघ्या ४८ तासांत पुन्हा मैदानात उतरलेल्या शफाली वर्माने आपल्या गोलंदाजीतील जादू दाखवून दिली. स्फोटक फलंदाजीमुळे लेडी सेहवाग या नावाने ओळखल्या जाणाऱ्या शफालीने देशांतर्गत क्रिकेट सामन्यात हॅटट्रिकचा डाव साधला आहे. बीसीसीआयच्या २३ वर्षांखालील महिला गटातील वनडे ट्रॉफी स्पर्धेत तिने हा पराक्रम करून दाखवलाय.

या स्पर्धेत शफाली वर्मा हरयाणा संघाचे नेतृत्व करत आहे. हरयाणा आणि कर्नाटक यांच्यातील सामना हा सामना गुवाहाटीच्या एसीए क्रिकेट अकादमीच्या ग्राउंडवर खेळवण्यात आला. या सामन्यात तिने दोन षटकांमध्ये मिळवून हॅट्ट्रिक साधली. पहिल्या प्री क्वार्टर फायनल लढतीत शफालीच्या कमालीच्या गोलंदाजीमुळे कर्नाटकच्या संघाचा डाव २१७ धावांतच आटोपला.

शफालीने ४४व्या षटकातील पाचव्या आणि सहाव्या चेंडूवर लागोपाठ दोन विकेट्स घेतल्यावर ४६व्या षटकातील पहिल्या चेंडूवर विकेट घेत हॅट्ट्रिक पूर्ण केली.

महिला प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेत शफाली वर्मा दिल्लीच्या ताफ्यातून खेळताना दिसली होती. नऊ सामन्यात तिने ३०४ धावा करत संघाला फायलपर्यंत पोहचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावल्याचे पहायला मिळाले, पण अंतिम सामन्यात तिला लौकिकाला साजेसा खेळ करता आला नाही. परिणामी तिसऱ्यांदा फायनल खेळल्यावरही दिल्ली कॅपिटल्स महिला संघाला ट्रॉफी जिंकता आला नाही. मुंबई इंडियन्सच्या संघाने दुसऱ्यांदा या संघाविरुद्ध फायनल बाजी मारत इतिहास रचला.

या स्पर्धेनंतर आता शफाली पुन्हा एकदा देशांतर्गत क्रिकेटमध्ये धमक दाखवून टीम इंडियाचे दरवाजे ठोठावण्यासाठी सज्ज झाली आहे.

## ६२व्या वर्षी क्रिकेट पदार्पणासह विश्वविक्रम



**कोस्टा रिका : वृत्तसंस्था**

क्रिकेट हा खेळ प्रतिभेचा तसाच फिटनेसचाही आहे. त्यामुळे चाळीशीनंतर स्पर्धात्मक क्रिकेट खेळणारे खेळाडू फारच कमी असतात, पण कधीकधी वय जास्त असलेले खेळाडूही आपल्या कामगिरीने संघात स्थान मिळवतात. अशाच एका खेळाडूची सध्या चर्चा रंगली आहे. मॅथ्यू ब्राउनली याने वयाच्या ६२व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करत विश्वविक्रम केला आहे.

एका नवीन संघाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये प्रवेश केला आहे. हा संघ आहे फॉकलंड आयलँड. या संघाने नुकताच कोस्टा रिकाच्या दौऱ्यावर पहिला आंतरराष्ट्रीय सामना खेळला. हा टी-२० सामना होता. १० मार्च रोजी खेळल्या गेलेल्या या सामन्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. फॉकलंड आयलँड हा आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणारा १०६वा संघ ठरला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, या संघाने पहिल्या

### फॉकलंड आयलँडच्या मॅथ्यू ब्राउनलीने रचला इतिहास

सामन्यात प्लेइंग ११मध्ये खेळवलेले सर्व खेळाडू हे ३१ वर्षांपेक्षा जास्त वयाचे होते. त्यात सर्वात वयस्कर खेळाडू मॅथ्यू ब्राउनली होता.

मॅथ्यू ब्राउनलीने वयाच्या ६२व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करून इतिहास रचला. तो पुरुषांच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट इतिहासातील सर्वात वयस्कर पदार्पण करणारा खेळाडू ठरला. एवढेच नाही, तर ब्राउनली वयाच्या ६० व्या वर्षानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणारा पहिला खेळाडूही ठरला. ब्राउनलीने या दौऱ्यात एकूण तीन टी-२० सामने खेळले. या काळात १०व्या क्रमांकावर फलंदाजी करताना त्याने पहिल्या सामन्यात १ धाव, दुसऱ्या सामन्यात नाबाद २ धावा आणि तिसऱ्या सामन्यात नाबाद ३ धावा केल्या. गोलंदाजीत त्याने एक षटकही टाकले, पण तो विकेट घेऊ शकला नाही.

फॉकलंड आयलँडने कोस्टा रिका दौऱ्यावर एकूण सहा सामने खेळले. त्यापैकी एक सामना त्यांनी जिंकला, तर पाच सामने कोस्टा रिकाने जिंकले. फॉकलंड आयलँडने जिंकलेल्या एकमेव सामन्यात मॅथ्यू ब्राउनली प्लेइंग ११चा भाग नव्हता.

## भारतातच १००व्या कसोटीनंतर निवृत्तीची घोषणा करणार होतो!



### अश्विनचा खुलासा

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२५ येत्या काही दिवसांत सुरू होत आहे. २२ मार्चपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेसाठी सर्वच संघांनी तयारीला सुरुवात केली आहे. रविचंद्रन अश्विन पुन्हा एकदा चेन्नई सुपर किंग्जच्या जर्सीमधून खेळताना दिसणार आहे. यादरम्यान अश्विनने आयपीएलपूर्वी त्याच्या कसोटी निवृत्तीबाबत मोठे वक्तव्य केले आहे.

भारताचा माजी अष्टपैलू खेळाडू आर अश्विनने खुलासा केला की, तो त्याचा १००वा कसोटी सामना खेळल्यानंतर निवृत्त होणार होता, पण महेंद्रसिंह धोनीमुळे तो निवृत्त होऊ शकला नाही. मार्च २०२४मध्ये धरमशाला येथील हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर इंग्लंडविरुद्धच्या पाचव्या सामन्यात अश्विनने कसोटी क्रिकेटमधील त्याचा १००वा सामना खेळला. यानंतर आर अश्विनने १८ डिसेंबर २०२४ रोजी बॉर्डर-गावसकर ट्रॉफीदरम्यान आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्तीची घोषणा केली.

अश्विनने सांगितले की, त्याने एमएस धोनीला त्याच्या १००व्या कसोटीसाठी धरमशाला येथे येण्याचे निमंत्रण दिले होते. या खास वेळी धोनीने त्याला स्मृतीचिन्ह द्यावे अशी त्याची इच्छा होती, मात्र या सामन्यासाठी धोनी येऊ शकला नाही. अश्विनने खुलासा केला की, त्याच दिवशी त्याला आपला अखेरचा सामना खेळायचा होता, पण तसे होऊ शकले नाही.

मला माहीत नव्हते की, धोनी मला चेन्नई सुपर किंग्स संघात पुन्हा येण्याची संधी देत याचं गिफ्ट देईल. हे गिफ्ट खूप कमाल आहे. मला पुन्हा सीएसके संघात सहभागी केल्याबद्दल धन्यवाद! एमएस संघात पुन्हा येऊन खूप छान वाटतंय, असेही अश्विनने म्हटले आहे.

## मुंबई इंडियन्सच्या खेळाडूला पीसीबीची नोटीस



**मुंबई : प्रतिनिधी**

जगातील लोकप्रिय आयपीएल स्पर्धेचा माहोल सेट झाला आहे. भारतीय खेळाडूंसह परदेशातील स्टार क्रिकेटर यंदाच्या हंगामासाठी सज्ज झाले आहेत. एका बाजूला या स्पर्धेत सहभागी संघ आणि त्यातील खेळाडूंची चर्चा रंगत असताना आता पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने घेतलेला एक निर्णय चर्चेत आला आहे.

पीसीबीने आयपीएलच्या यंदाच्या हंगामात मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात दाखल झालेल्या दक्षिण आफ्रिकेच्या कॉर्बिन बॉश याला कायदेशीर नोटीस पाठवली आहे. पाकिस्तान सुपर लीग स्पर्धेसाठी केलेला करार मोडून त्याने नियमांचे उल्लंघन केले आहे, असा आरोप पीसीबीने दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूवर केला आहे.

भारतातील आयपीएल स्पर्धेदरम्यानच पाकिस्तान सुपर लीगचा थरारही रंगणार आहे. ११ एप्रिल ते १८ मे या कालावधीत पाकिस्तानमधील यंदाची पीएसएल स्पर्धा खेळवण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी दक्षिण आफ्रिकेचा कॉर्बिन बॉश हा पेशावर झल्मी या फ्रँचायझी संघाच्या ताफ्यात सहभागी झाला होता, पण आयपीएलमध्ये खेळण्याची ऑफर मिळताच त्याने या स्पर्धेतून आपले नाव माघार घेण्याचा निर्णय घेतला. या गोष्टीमुळे आता पीसीबीने बॉशला कारणे दाखवा नोटीस पाठवली आहे.

## वेस्ट इंडिजच्या खेळाडूशी युवराज भिडला



**रायपूर : वृत्तसंस्था**

सचिन तेंडुलकरच्या नेतृत्वाखालील इंडिया मास्टर्स संघाने ब्रायन लाराच्या नेतृत्वाखालील वेस्ट इंडिज मास्टर्सचा पराभव करून इंटरनॅशनल मास्टर्स लीगचे विजेतेपद पटकावले. ही स्पर्धा पहिल्यांदाच आयोजित करण्यात आली आणि भारताने बाजी मारली. या सामन्यात अंबाती रायडू, सचिन तेंडुलकर आणि विनय कुमार यांनी इंडिया मास्टर्ससाठी चमकदार कामगिरी केली, तर सामन्यादरम्यान युवराज सिंग आणि वेस्ट इंडिज खेळाडूमधील वादाने सर्वांचे लक्ष वेधले.

युवराज सिंग नेहमीच त्याच्या झंझावाती फलंदाजीसाठी आणि आक्रमकतेने खेळण्यासाठी ओळखला जातो. इंटरनॅशनल मास्टर्स लीगच्या अंतिम सामन्यात वेस्ट इंडिज मास्टर्स संघाने प्रथम फलंदाजी करत १४८ धावा केल्या. यानंतर लक्ष्याचा पाठलाग करताना इंडिया मास्टर्स संघ चांगल्या स्थितीत दिसत होता आणि १३व्या षटकात अंबाती रायडू आणि युवराज सिंग त्यांच्यासाठी फलंदाजी करत होते.

दरम्यान, १३वे षटक संपल्यानंतर युवराज आणि वेस्ट इंडिजचा वेगवान गोलंदाज टिनो बेस्ट यांच्यात वादावादी सुरू झाली. टिनो बेस्टने षटक टाकल्यानंतर तो मैदानाबाहेर जात होता, पण युवराजने याबद्दल पंचांना सांगितले आणि त्यामुळे गोलंदाजाला मैदानात परत यावे लागले. यानंतर युवराज सिंग आणि टिनो बेस्ट यांच्यात वाद सुरू झाला. वाद चिघळल्याचे पाहून मैदानावरील इतर खेळाडू पुढे आले आणि त्यांनी प्रकरण शांत केले.

## आयपीएलआधीच उमरान 'आऊट'

### 'केकेआर'ला धक्का



**कोलकाता : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीग २०२५च्या हंगामाआधी गत चॅम्पियन कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) फ्रँचायझी संघाला मोठा धक्का बसला आहे, कारण भारताचा सर्वात जलदगती गोलंदाज असा टॅग लागलेला उमरान मलिक यंदाच्या हंगामात मैदानात उतरणार नाही.

'जम्मू एक्सप्रेस' नावाने ओळखला जाणाऱ्या उमरान मलिकवर दुखापतीमुळे आयपीएलमधून माघार घेण्याची वेळ आली आहे. सनरायझर्स हैदराबादच्या ताफ्यातून खेळताना त्याने १५७ केएमपीएच वेगाने चेंडू टाकत खास रेकॉर्ड सेट केला आहे. आयपीएलच्या इतिहासात सर्वात वेगवान चेंडू टाकणारा तो तिसरा गोलंदाज ठरला होता. सर्वात वेगाने चेंडू फेकण्याची क्षमता असणारा भारतीय गोलंदाज हा टॅगही त्याला लागला. केकेआरने त्याच्या जागी मध्यम जलदगती गोलंदाज चेतन सकारियाला बदली खेळाडूच्या रूपात संघात घेतले आहे. सकारियाने टीम इंडियाकडून एक वनडे आणि दोन टी-२०सह आयपीएलमध्ये १९ सामने खेळले आहेत.

## क्रिकेट दौऱ्यात कुटुंबाला दूर ठेवण्याच्या नियमावर विराटने ठेवले बोट



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफीतील विजयानंतर भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली १५ मार्च रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या गोटात दाखल झाला. याच दिवशी फ्रँचायझीने पदुकोण-द्रविड सेंटर फॉर स्पोर्ट्स एक्सलन्स येथे इनोव्हेशन लॅब इंडियन स्पोर्ट्स समिट नावाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या वेळी विराटने सीरिजदरम्यान आपल्या कुटुंबीयांना खेळाडूंपासून दूर ठेवल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. आयपीएल २०२५ सुरू होण्यापूर्वी त्याने बीसीसीआयच्या या नियमावर संतापही व्यक्त केला.

विराट कोहलीने या दौऱ्यात आपल्या कुटुंबाची उपस्थिती मर्यादित केल्याबद्दल आणि खराब कामगिरीसाठी त्यांना जबाबदार धरल्याबद्दल निराशा व्यक्त केली. तो म्हणाला, कुटुंबातील सदस्यांचा खराब कामगिरीशी काहीही संबंध नाही, उलट त्यांच्या उपस्थितीमुळे कामगिरी सुधारण्यास नक्कीच मदत होते.

### काय आहे बीसीसीआयचा नियम?

टीम इंडियाला गेल्या वर्षी मायदेशात झालेल्या कसोटी मालिकेत न्यूझीलंडविरुद्ध दारुण पराभवाला सामोरे जावे लागले होते. ऑस्ट्रेलियात सलग दोन मालिका जिंकणाऱ्या भारतीय संघाची कामगिरी बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्येही अत्यंत खराब झाली होती. विराट कोहली आणि कर्णधार रोहित शर्मासह अनेक खेळाडू वाईटरित्या फ्लॉप ठरले होते. यानंतर बीसीसीआयने कठोर प्रवास धोरण जाहीर केले आणि परदेशी दौऱ्यांमध्ये खेळाडूंच्या कुटुंबीयांची उपस्थिती मर्यादित केली. नियमानुसार आता जोडीदार आणि खेळाडूंची मुले दोन आठवड्यांसाठी प्रत्येक मालिकेत एकदाच येऊ शकतात. यामुळे कोहली आणि रोहित शर्मासारख्या वरिष्ठ खेळाडूंना मोठा धक्का बसला आहे. पूर्वी असे कोणतेही बंधन नव्हते.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. —मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com